# दैनिक राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २२६ I शुक्रवार २९ मे २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com


# ३० मेपासून तळपत्या उन्हात आमरण उपोषण

## मंडप लावणार नाही; उष्माघाताने जीव गेला तर फडणवीस जबाबदार : मनोज जरांगे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जालना :** मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील ३० मे रोजी मंडप न लावता तळपत्या उन्हात आमरण उपोषण सुरू करणार आहेत. पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली. या उपोषणात ते अन्न, पाणी घेणार नाहीत आणि पायात चप्पलही घालणार नाहीत. उपोषणादरम्यान उष्माघाताने आपला जीव गेला तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जबाबदार राहतील, असे मनोज जरांगे यांनी म्हटल आहे.

सरकारला पुरेसा वेळ दिल्याचा उल्लेख करत जरांगे यांनी आता कठोर पाऊल उचलण्याची गरज असल्याचे सांगून जरांगे म्हणाले की, तीन वर्षांपासून आंदोलन सुरू असताना सरकार चर्चेसाठी सतत वेळ मागत आहे. आता थांबता येणार नाही. सरकारने मराठा समाजातील मुलांचा उन्हाळा करून टाकल्यामुळे आता माघार घेण्याचे प्रश्नच उद्भवत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

जरांगे यांनी सरकारवर जोरदार टीका केली. सातारा गॅझेटचा निर्णय अद्याप झालेला नाही. एका महिन्याच्या मुदतीत माहिती देण्याचे आश्वासन दिले होते, तरी दहा महिने उलटले तरी काहीच झाले नाही. गुन्हे दाखल करून आंदोलकांवर दबाव टाकला जातो, पण गुन्हे मागे घेतले जात नाहीत. मराठा-कुणबी एकच आहेत, असे वारंवार सांगितले जाते, तरीही एकत्रित **(पान ४ वर)**



**मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला विनंती केली आहे की, उपोषण स्थळी कोणी येऊ नये. सरकार मराठा समाजाला संभ्रमात ठेवण्याचा डाव खेळत असल्याचे त्यांचे मत आहे. उपोषण स्थळी फक्त पत्रकारांसाठी एक छोटा मंडप उभारला जाईल, बाकी संपूर्ण उपोषण उघड्या उन्हातच होईल. देशात कुठेही न झालेल्या प्रकारचे हे आंदोलन असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.**



## ‘सहजयोग’ भाग ६५

### महाराष्ट्र ही पावनभूमी आहे...

समहाराष्ट्रात सर्व विश्वाची कुंडलिनी नावाची शक्ती आहे. पण ही कुंडलिनी सुप्तावस्थेत आहे एवढच आहे. पण तिचे परिणाम मात्र आपल्या चरित्रावर, आपल्या संस्कृतीवर आहेत. महाराष्ट्रात सुद्धा असे अनेक लोक होऊन गेले ज्यांचे वर्णन करता येत नाही. ज्ञानेश्वर एक असे झाले तरी आपल्याला माहिती आहेत की कितीतरी संत साधू वारंवार म्हणजे तुम्ही दत्तात्रयांच्या वेळेपासून पाहिले ते सुद्धा या महाराष्ट्रात झाले. इतकच नव्हे तर जे मोठे मोठे संत-साधू झाले त्यांनी नेहमी महाराष्ट्राला भेट दिली. जे बाहेर होते, गुरूनानक होते ते इकडे आले किंवा जे जे असे- वल्लभाचार्य होते फार मोठे ते महाराष्ट्रात येऊन गेले. इतकेच नव्हे तर श्री राम आणि श्री सीता या पुनीत भूमीवर फिरलेले आहेत. त्यांचे चरण या भूमीला लागलेले आहेत. ही भूमी पावन आहे आणि त्या पावन भूमीत तुमचा पावन जन्म झाला आहे. पण आपण पावन आहोत ही कल्पना मात्र फार कमी लोकांना आहे आणि त्यामुळेच सगळे प्रश्न उभे राहतात. तुम्ही पावन आहात म्हणजे तुमच्यात एक फार मोठी शक्ती आहे. ही शक्ती पावित्र्याची शक्ती तुमच्यात आहे. आणि ही जी पावित्र्याची शक्ती आहे ती जास्त वाढवली पाहिजे. ती कमी करू नये. ती आपण कमी करत जातो. सीतेची पावन शक्ती एवढी जबरदस्त होती की रावणासारखा राक्षस सुद्धा तिच्याकडे डोळे वर करून बघू शकत नसे. आपल्या देशामध्ये पावन शक्तीला फार म हत्त्व दिलेले आहे आणि ती पावन शक्ती महाराष्ट्रात फार आहे.

०२ फेब्रुवारी १९८२ पुणे

अधिक माहितीसाठी

www.sahajayogamumbai.org

8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## इंधन दरवाढीने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले

# पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज रद्द करा

## जयंत पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** देशभरात पेट्रोल-डिझेलच्या दरात सातत्याने होत असलेल्या वाढीमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, वाहतूकदार आणि उद्योग क्षेत्र अडचणीत सापडले असून, महाराष्ट्र सरकारने इंधनावरील व्हॅट आणि सरचार्ज तात्काळ रद्द करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते व आम दार जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

जयंत पाटील यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत राज्य सरकार पेट्रोल-डिझेलवर आकारत असलेला व्हॅट आणि सरचार्ज रद्द केल्यास इंधनाचे दर मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकतात, असे म्हटले आहे. यामुळे केवळ वाहनधारकांनाच नव्हे, तर वाहतूक, शेती आणि उद्योग क्षेत्रालाही मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. मागील दहा दिवसांत चौथ्यांदा इंधन दरवाढ करण्यात आली असून, पेट्रोलमध्ये २ रुपये ६१ पैसे तर डिझेलमध्ये २ रुपये ७१ पैशांची वाढ झाली आहे. सध्या मुंबईत पेट्रोलचा दर १११.१२ रुपये प्रति लिटर तर डिझेलचा दर ९६.८६ रुपये प्रति लिटरपर्यंत पोहोचला आहे.

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे देशाच्या आर्थिक स्थितीवर ताण वाढला असून, महागाईने उच्चांक गाठला आहे. खाद्यतेल, भाजीपाला आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढल्याने सामान्य नागरिक आधीच त्रस्त असताना, इंधन दरवाढीने त्यात आणखी भर पडली आहे. याचा थेट परिणाम शेती, मालवाहतूक आणि दैनंदिन जीवनावर होत असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रात नमूद केले आहे.

राज्य सरकार पेट्रोलवर सुमारे २५ टक्के व्हॅट आणि १०.१२ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारते, तर डिझेलवर सुमारे २४ टक्के व्हॅट आणि ३ रुपये प्रति लिटर सरचार्ज आकारला जातो. हे कर रद्द केल्यास पेट्रोल आणि डिझेलचे दर थेट ७० ते ८० रुपयांच्या दरम्यान येऊ शकतात, असा दावा **(पान ४ वर)**

### सीएनजी गॅसलाही दरवाढीचा झटका

पेट्रोल-डिझेल दरवाढीनंतर आता सीएनजी गॅसच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. पुण्यात गुरुवारपासून सीएनजीच्या दरात प्रतिकिलो २.५० रुपयांची वाढ झाली असून, नवीन दर ९४.८५ रुपये प्रति किलो झाला आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि हिंजवडी परिसरातील सर्व पंपांवर हे नवे दर लागू करण्यात आले आहेत. तर नाशिकमध्ये सीएनजीच्या दरात १.३५ रुपयांची वाढ झाली असून, प्रतिकिलो दर ९६.५० रुपयांवर पोहोचला आहे.




हॉटेल ग्रामपंचायतची मालकीण

## रिलस्टार रोहिणी पाराध्ये यांची आत्महत्या!

**भरत नागणे । राष्ट्र सह्याद्री**

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील प्रसिद्ध रिलस्टार आणि हॉटेल ग्रामपंचायतच्या मालकीण रोहिणी पाराध्ये यांच्या मृत्यूमुळे सर्वांना मोठा धक्का बसला. २५ वर्षांच्या रोहिणी पाराध्ये यांचा मृतदेह मंगळवारी हॉटेल ग्रामपंचायतच्या स्वयंपाकघरात आढळून आला. रोहिणी यांनी कौटुंबिक वादातून आत्महत्या केल्याची प्राथमिक माहिती तपासातून समोर आली आहे.



रोहिणी आणि निलेश यांनी प्रेमविवाह केला होता. काही काळ ते पुणे येथे राहत होते. तिथेच त्यांनी रिल करायला सुरुवात केली होती. मंगळवेढा तालुक्यात ब्रम्हपुरी येथील हॉटेल ग्रामपंचायतीच्या त्या मालकीन होत्या. अज्ञात कारणावरून आत्महत्या केली असल्याचे सांगितले जात असले तरी त्यांनी कौटुंबिक **(पान ४ वर)**

विधान परिषद निवडणूक...

## शिवसेनेचा सहा जागांचा हट्ट कायम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** विधानपरिषदेच्या १८ जागांपैकी ६ जागांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अडून बसले असल्याने या जागावाटपाचा वाद आता केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दरबारात पोहोचल्याची माहिती समोर येत आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे गेल्या दोन दिवसांपासून दिल्ली दौऱ्यावर आहेत. राज्यातील तिन्ही मुख्य नेते दिल्लीत एकाचवेळी असल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून दिल्लीत असलेल्या एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, राजकीय बैठकीसाठी मी दिल्लीत आलो नव्हतो. राज्याच्या विकासकामासाठी आलो होतो. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे **(पान ४ वर)**

साठवण तलावाने हिरावली तीन स्वप्नं...

## एमबीएचे शिक्षण घेणाऱ्या तिघा मित्रांचा दुर्दैवी अंत; लोणी परिसरात शोककळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी । लोणी :** आयुष्यात मोठी स्वप्नं पाहणारे, कुटुंबाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी उच्च शिक्षण घेत असलेले तीन तरुण मित्र गुरुवारी दुपारी एका क्षणात काळाच्या पडद्याआड गेले आणि संपूर्ण परिसर सुन्न झाला. लोणीजवळील चंद्रपूर येथील साठवण तलावात बुडून एमबीएच्या तिन्ही विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू हा केवळ अपघात नसून अनेक कुटुंबांची स्वप्नं उद्ध्वस्त करणारी हृदयद्रावक घटना ठरली आहे.



मृत तिघेही पायरेन्स आयबीएमए महाविद्यालयात एमबीएच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत होते. अभिषेक गंगाधर जाधव (वय २४, रा. सुरेगाव शिंगणापूर, ता. नेवासा), प्रवीण प्रभाकर रसाळ (वय २३, रा. रामनगर, छत्रपती संभाजीनगर) आणि महेश अशोक शिंदे (वय २६, रा. संत ज्ञानेश्वर नगर, छत्रपती संभाजीनगर) अशी मृत विद्यार्थ्यांची **(पान ४ वर)**

## मुलाला जीवे मारण्याची धमकी देऊन महिलेवर भोंदू बाबाचा लैंगिक अत्याचार

### मतिमंद मुलाचा आजार बरा करण्याचे आमिष दाखवून साडेसहा लाखाची फसवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** मतिमंद मुलाचा आजार बरा करण्याचे आणि भावाचे लग्न जमवून देण्याचे आमिष दाखवून एका कुटुंबाची साडेसहा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेरमध्ये उघडकीस आला आहे. एवढेच नव्हे तर, मुलाला जिवंत मारण्याची धमकी देऊन भोंदूबाबाने पीडित महिलेवर वारंवार जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची चटका लावणारी घटना समोर आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात मुख्य भोंदू बाबा, त्याचा मुलगा आणि महिला साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, पठारे मळा, पारनेर येथील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय पीडित आहे. वैद्यकीय उपचार करूनही **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### इबोला संसर्गाचा धोका वाढला

मुंबई : आफ्रिकेत इबोला संसर्गाचा वाढता धोका लक्षात घेता केंद्र सरकारने महाराष्ट्रासह सर्व राज्यांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

### केंद्राकडून सतर्कतेचे निर्देश

आरोग्य यंत्रणेचा तातडीने आढावा घेण्याचे आणि निगराणी व्यवस्था सक्षम करण्याचे निर्देश दिले आहेत. विमानतळांपासून रुग्णालयांपर्यंत कोणत्याही आरोग्यविषयक आपतीला साम ोरे जाण्यासाठी सज्ज राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जारी केलेल्या पत्रानुसार, जागतिक आरोग्य संघटनेने इबोला उद्रेकाला आरोग्यविषयक आणीबाणी घोषित केली आहे.

दक्षिण सुदानसह सीमावर्ती भागातही संसर्गाचा धोका वाढला आहे. मुंबईसह राज्यात एकाही रुग्ण आढळलेला नाही; मात्र केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात येईल, असे आरोग्य विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.प्रवास इतिहासावर लक्ष अलीकडच्या काळात प्रभावित देशांचा प्रवास केलेल्या व्यक्तीवर आणि ताप, अशक्तपणा, डोकेदुखी, स्नायू दुखणे, उलट्या, जुलाब, घशात खवखव किंवा त्वचेवर लाल पुरळ अशी लक्षणे असलेल्या विशेष लक्ष ठेवण्यास सूचित केले आहे.




**माजीमंत्री श्री.शंकरराव गडाख साहेब यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**

**नेवासा तालुका खरेदी विक्री संघ लि. नेवासा ता.नेवासा**

मार्गदर्शक- शंकरराव गडाख पाटील

चेअरमन- श्री.प्रभाकरराव कोलते पाटील  व्हाईस चेअरमन- श्री.संतोष फिरोदिया

* सर्व सन्माननीय संचालक *

श्री.सुभाष शंकर चव्हाण, श्री.रविंद्र शरद मारकळी, श्री.कैलास बाळकृष्ण काळे, श्री.विजूचंद देवीचंद चरवंडे, श्री.सोपान जनार्धन चौधरी, श्री.मच्छिंद्र शंकर कडू, श्री.युवराज माणिकराव तनपुरे, श्री.निवृत्ती भानुदास थोपटे, श्री.बादशहा बुऱ्हानभाई इनामदार, डॉ.सौ.शुभांगी महेशराजे देशमुख, श्री.राजेंद्र रामकृष्ण पोतदार, श्री.रमेश विश्वनाथ गोर्डे,सौ.सुशीलाबाई दत्तात्रय शेटे, श्री.दीपक साहेबराव चौधरी,श्री.जनार्धन पिराजी पिटेकर,


मॅनेजर-ए.एम.पटारे

नेवासा तालुका खरेदी विक्री संघ लि. नेवासा ता.नेवासा जि. अ,नगर



# देवापुढे सारे समान...!






पंढरपूरच्या विठुरायाने पुन्हा एकदा महाराष्ट्राला भक्तीचा खरा अर्थ शिकवला आहे. देवाच्या दारात पद, पैसा, सत्ता आणि ओळख यांना काहीच किंमत नसते; तेथे फक्त भक्ती चालते, हे अधिकमासातील पंढरपूरने संपूर्ण देशाला दाखवून दिले आहे. विठ्ठल मंदिरातील व्हीआयपी दर्शन बंदीचा निर्णय हा केवळ प्रशासनाचा आदेश नाही, तर तो भारतीय भक्तीपरंपरेच्या मूळ तत्त्वांना दिलेला सन्मान आहे. म्हणूनच आज सामान्य वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद हा केवळ दर्शनाचा नाही, तर देव खऱ्या अर्थाने आमचाही आहे या भावनेचा आहे.

पंढरपूरचा विठोबा हा संतांच्या परंपरेतून उभा राहिलेला देव आहे. संत तुकाराम, ज्ञानेश्वर, नामदेव, चोखामेळा, जनाबाई यांनी विठ्ठलाला कधी राजसत्तेचा देव मानला नाही; तो कायम रंजल्या-गांजल्यांचा, शेतकऱ्यांचा, वारकऱ्यांचा देव राहिला. जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले हीच वारकरी संप्रदायाची शिकवण आहे. त्यामुळे विठ्ठलाच्या मंदिरात सामान्य भक्त तासन्तास रांगेत उभा राहील आणि एखादा मंत्री, उद्योगपती किंवा मोठा अधिकारी थेट गाभाऱ्यात जाऊन आरामात दर्शन घेईल, ही गोष्ट वारकरी परंपरेलाच विरोध करणारी होती.

यंदा राज्य शासनाने आणि प्रशासनाने घेतलेला व्हीआयपी बंदीचा निर्णय त्यामुळे ऐतिहासिक ठरतो. आज देवाच्या नित्योपचाराच्या वेळी ज्या जागी मोठ्या व्यक्तींना बसण्याचा अधिकार मिळायचा, त्या जागी साधा वारकरी बसून विठुरायाला डोळे भरून पाहत आहे. दोन सेकंदांत ढकलले जाणारे दर्शन आता वीस मिनिटे अनुभवता येत आहे. चाळीस वर्षांच्या वारीत पहिल्यांदाच खरा विठ्ठल भेटला असे बोलके शब्द आज हजारो मायमाऊलींच्या तोंडी आहेत. हा बदल केवळ व्यवस्थापनातील नाही; तो भक्तीतील समतेचा पुनर्जन्म आहे.

देशातील अनेक मोठ्या मंदिरांमध्ये व्हीआयपी दर्शन हा कायम वादाचा विषय राहिला आहे. तिरुपती बालाजी मंदिरात सामान्य भाविकांना १० ते १२ तास रांगेत थांबावे लागते, तर विशेष शुल्क किंवा शिफारशीवर काही मिनिटांत दर्शन मिळते, अशी तक्रार वारंवार होत आली आहे. शिर्डीच्या साईबाबा मंदिरातही व्हीआयपी पास संस्कृतीवरून अनेकदा संताप व्यक्त झाला. सामान्य भक्त उन्हात उभे राहतात आणि काहीजण थेट गाभाऱ्यात जातात, यामुळे असंतोष वाढला. मुंबईतील सिद्धिविनायक मंदिरात तर राजकारणी आणि सेलिब्रिटींसाठी विशेष सुरक्षा व विशेष दर्शनाची व्यवस्था अनेकदा चर्चेत राहिली आहे. केरळमधील सबरीमला, जम्मूतील वैष्णोदेवी किंवा उत्तराखंडमधील केदारनाथ-बद्रीनाथ येथेही सामान्य भक्त आणि व्हीआयपी यांच्यातील भेदभावावर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

खरं तर मंदिर हे श्रद्धेचे स्थान आहे; तेथे विशेष कोणीच नसते. देव हा सत्ताधाऱ्यांचा किंवा श्रीमंतांचा खासगी मालमत्ता नसतो. मात्र गेल्या काही दशकांत मंदिर व्यवस्थापनात व्हीआयपी संस्कृती इतकी शिरली की, भक्तीपेक्षा ओळखीचे महत्त्व वाढू लागले. पैशाने विशेष दर्शन, विशेष आरती, विशेष प्रवेश असे प्रकार सुरू झाले. देवदर्शनही जणू आर्थिक वर्गवारीत विभागले गेले. ज्याच्याकडे पैसा आणि सत्ता, त्याला देवाजवळ पोहोचण्याचा शॉर्टकट; बाकी सामान्य भक्तांसाठी लांबच लांब प्रतीक्षा. ही परिस्थिती भारतीय अध्यात्माच्या मूळ तत्त्वांनाच हरताळ फासणारी आहे.

भारतीय संतपरंपरेने नेहमी समतेचा संदेश दिला. संत चोखामेळा मंदिराबाहेर उभा राहिला, तरी त्याच्या भक्तीला विठ्ठलाने प्रतिसाद दिला. संत कबीरांनी सांगितले की, देव शोधण्यासाठी मोठेपणा लागत नाही; निर्मळ मन लागते. गुरु नानकांनी जात-पात मोडून सर्वांना समान मानले. मग आज देवळांमध्ये माणसांचे वर्गीकरण कोणत्या तत्त्वावर केले जाते? देवाला भेटण्यासाठी पैशाची तिकीट व्यवस्था का असावी? हा प्रश्न समाजाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

पंढरपूरमधील निर्णयाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे ‑ व्यवस्थापन इच्छाशक्ती दाखवली तर सामान्य भक्ताला सन्मानाने दर्शन मिळू शकते. व्हीआयपी बंदीमुळे रांगा वेगाने पुढे सरकत आहेत, गोंधळ कमी झाला आहे आणि भाविक समाधानाने परतत आहेत. म्हणजेच व्हीआयपी संस्कृती ही व्यवस्थापनासाठी आवश्यक असल्याचा दावा खोटा ठरतो. उलट सामान्य भक्तांच्या वेळेची, श्रमांची आणि श्रद्धेची किंमत ओळखणारी व्यवस्था अधिक प्रभावी ठरते.

आज गरज आहे ती हा आदर्श इतर देवस्थानांनीही स्वीकारण्याची. महाराष्ट्रातील शिर्डी, तुळजापूर, त्र्यंबकेश्वर, कोल्हापूर महालक्ष्मी यांसारख्या मंदिरांनी तसेच देशातील प्रमुख देवस्थानांनीही देवदर्शनातील भेदभाव कमी करण्याचा विचार केला पाहिजे. विशेषतः सार्वजनिक देवस्थानांमध्ये समानतेचा सिद्धांत काटेकोरपणे पाळला गेला पाहिजे. मंदिर हे लोकांचे असते; त्यामुळे तेथे सर्वांना समान सन्मान मिळणे हीच खरी धर्मभावना आहे.

भक्ती ही पैशावर, पदावर किंवा ओळखीवर उभी राहत नाही. ती श्रद्धेवर उभी असते. विठ्ठलाच्या दारात आज एक सामान्य वारकरी डोळ्यांत पाणी आणून म्हणतोय, आज खऱ्या अर्थाने विठ्ठल भेटला. हाच या निर्णयाचा सर्वात मोठा विजय आहे. देवापुढे कोणी व्हीआयपी नसतो, हे पंढरपूरने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. आणि कदाचित, हीच आपल्या समाजाला आज सर्वाधिक आवश्यक असलेली शिकवण आहे.

# जिवनात स्थैर्य प्राप्तीसाठी राम नाम जप अन् गोमातेची सेवा करा : सेवानाथ महाराज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**माळवडगाव** : भगवान श्रीकृष्णाने गोमातेच्या रक्षणासाठी जन्म घेतला असून जीवनात स्थैर्य प्राप्त करण्यासाठी राम नाम जप अन् गोमातेची सेवा करा असे प्रतिपादन सेवानाथ महाराज गोरक्षनाथ आश्रम खोकर यांनी बाजाठान ( ता.वैजापूर) येथील राम दरबार आश्रमातील त्रिदीनी अखंड राम नाम जप सोहळ्याचे सांगता काल्याचे किर्तनात भाविकांना उपदेश करताना केले.

गोदाकाठच्या बाजाठान येथील प्रेममुर्ती हरिशरणगिरी महाराज यांच्या रामदरबार आश्रमात पुरूषोत्तम अधिक मास निमिताने सदगुरू नारायणगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने महंत रामगिरी महाराज यांच्या प्रेरणेने हरिशरणगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दि.२६ ते २८ मे तीन दिवस अखंड राम नाम जप सोहळ्याचे करण्यात आले होते..या सोहळ्याची सांगता आज सकाळी सेवानाथ महाराज यांच्या सांगता काल्याचे किर्तनाने संपन्न झाली. कंठी धरिला कृष्ण मनीं ,अवघा जनी प्रकाश ,या श्रीकृष्ण चरित्र गौळणपर अभंगातून भाविकांना निरूपण करताना महाराज पुढे म्हणाले की प्रेममुर्ती हरिशरणगिरी महाराज यांच्या सानिध्यात श्रीराम मंदिर अन् रामदरबार आश्रमाची भूमी पवित्र झाली आहे. गोमातेची सेवा असणाऱ्या या चैतन्यमय ठिकाणी आल्यावर भाविकांना प्रसन्न उत्साह वातावरणात ऊर्जा मिळते.

देवाची भक्ती करताना अंतःकरणात आदर शुध्द भाव असायला हवा. राम नामा सारखे जीवनात दुसरे धन नाही.भगवान श्रीकृष्णाने गोमातेसाठी अवतार घेतलेला आहे.गोमातेची सेवा करा जीवनात स्थैर्य प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. आज पृथ्वीवर उष्णतेचा पारा वाढलेला आहे.विदर्भात ४७ पर्यंत तापमान वाढलेले आहे.आपल्याकडेही ४२ पर्यंत तापमान वाढलेले आहे.१९३२ पर्यंत जगात विचित्र नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागणार अशी भविष्यवाणी तज्ञ करत आहे. भविष्यात अशी संकटे टाळायची असेल तर गोमातेची सेवा करा. गोमातेसाठी अनेक दानशूर दानधर्म करतात. दानधर्म करताना आपण दिलेले दान अनाठायी जात नाही ना? याची खात्री करणे गरजेचे आहे. गोशाळेसाठी अनेक महाभाग देणगी गोळा करतात. पडताळणी केल्यावर प्रत्यक्षात त्यांच्या गोशाळेत गायीच नसतात असे आढळून आले आहे.

या सांगता सोहळा कार्यक्रमास शेषदादा महाराज, विजयानंदगिरी महाराज, गंगागिरी महाराज आश्रम पुणतांबा,सुदाम महाराज चौधरी भोकर आश्रम, अशोक काळे खोकर आश्रम, भोला ऊदावंत,दादासाहेब तोडमल, सुभाष भराडे, सिताराम भराडे, रमेश मेघळे गुरूजी, विलास पवार शास्त्री, पत्रकार रवींद्र पवार, पत्रकार भाऊसाहेब काळे, मधुकर वालतुरे, कृष्णा डिके,वेदांत डिके, आण्णा खोकले, गणेश काळे, मृदुंगाचार्य मुकुंद महाराज,गोपाल महाराज, प्रथमेश महाराज गायनाचार्य दादा महाराज,शिवराम बापू महाराज,शंकर महाराज, बाळासाहेब महाराज आदी उपस्थित होते.गोविंद जाधव सायखेडा या परिवाराचे वतीने महाप्रसाद पगंत देण्यात आली.

# दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : आपल्याकडील अचल संपत्तीपेक्षा शिक्षणातून मिळणाऱ्या विद्वत्तेला जगात अधिक किंमत आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत स्वतःचे छंद जोपासत मोठे व्हावे आणि समाजाच्या उत्कर्षासाठी योगदान द्यावे, असे प्रतिपादन आमदार यांनी केले. भ्रमणध्वनीचा अतिरेक टाळून युवकांनी ज्ञान, संस्कार आणि सातत्य यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले. संजीवनी युनिव्हर्सिटी, संजीवनी उद्योग समूह व सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याच्या संयुक्त विद्यमाने संजीवनी अभियांत्रिकी महाविद्यालयात दहावी-बारावीतील गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक व मुख्याध्यापकांचा सत्कार तसेच करिअर मार्गदर्शन मेळावा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रास्ताविकात संजीवनी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमितदादा कोल्हे यांनी संस्थेच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेताना गेल्या ४४ वर्षांत ३२ हजारांहून अधिक विद्यार्थी येथे शिक्षण पूर्ण करून देश-विदेशात उच्च पदांवर कार्यरत असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने संस्थेची स्थापना करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. आमदार विवेक कोल्हे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानाबरोबरच बदलत्या जगातील घडामोडींचे भान ठेवणे आवश्यक आहे. डिजिटल युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स, रोबोटिक्स, मशिन लर्निंग यांसारख्या क्षेत्रांना मोठी मागणी निर्माण होत असून युवकांनी त्यानुसार स्वतःला सक्षम करावे. सर्व यशस्वी व्यक्तींमध्ये सातत्य हा समान गुण असतो, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. कार्यक्रमास नगराध्यक्ष पराग संधान, डायरेक्टर डॉ. आर. ए. कापगते, प्राचार्य अभिजित मिरीकर, डॉ. विपुल पटेल, डॉ. विनोद मालकर यांच्यासह शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. साहेबराव दवंगे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. आर. ए. कापगते यांनी केले.

# स्वाभिमानी गणेश परिसराकडून आ. विवेक कोल्हे यांचा जंगी नागरी सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहता** : श्री गणेश परिसराच्या वतीने आमदार यांचा विरभद्र महाराज मैदान येथे जंगी नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी विविध पक्षांतील नेतेमंडळींनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या. विवेक कोल्हे यांच्या लोकप्रियतेमुळे हजारो नागरिकांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त उपस्थिती लावली.

सत्काराला उत्तर देताना विवेक कोल्हे म्हणाले की, मला दुसऱ्यांची रेष पुसण्यापेक्षा स्वतःची रेष मोठी करण्याच्या सकारात्मक राजकारणात रस आहे. गणेश परिसराने स्व. शंकरराव कोल्हे यांच्यासारखे गुण आपल्यात असल्याची जाणीव करून दिल्यानंतर मोठी प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

गणेश कारखाना अडचणीत असताना मोठ्या कष्टातून तो सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. ऊस उत्पादकांना सर्वोच्च भाव देत १७७ कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली तसेच १४ कोटी रुपयांची जुनी देणी अदा करून कर्मचाऱ्यांना दिलासा दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आमचा कुणाशी व्यक्तिद्वेष नाही, संस्थेचे हित जपणे हाच आमचा उद्देश आहे, असेही ते म्हणाले.

राजकीय प्रवासाबाबत बोलताना त्यांनी शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीचा उल्लेख करत, त्या निवडणुकीत जे घडले त्याचे आता समाधान वाटते. अन्यथा कदाचित अमित शाह यांच्याशी भेट झाली नसती, असे सांगितले. आता केवळ पाच जिल्ह्यांपुरते नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र मिळाल्याचे विधान करताच उपस्थितांमध्ये जल्लोष झाला.

राहता आणि लोणी परिसरातील जनतेसाठी अर्ध्या रात्रीही उभा राहीन, असे सांगत त्यांनी पश्चिमेचे पाणी पूर्वेकडे वळवणे, विजेचे प्रश्न व निळवंडेच्या पोटचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन दिले.

यावेळी घायल होता हूँ तो घातक होता हूँ, असे म्हणत त्यांनी विरोधकांना सूचक इशाराही दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गणेशचे माजी संचालक रामचंद्र बोठे होते. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार

श्रीरामपूर : अल्पवयीन मुलाशी मैत्री करून त्याच्यावर अनैसर्गिक लैंगिक अत्याचार केल्याचा तसेच त्याचे अश्लील व्हिडीओ चित्रीकरण करून व्हायरल करण्याची धमकी देत, वारंवार शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार शहरात उघडकीस आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध भारतीय न्यायसंहिता व पॉक्सो कायद्यान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सदर अल्पवयीन मुलाच्या फिर्यादीवरून सलमान सलीम इराणी, अली अब्बास सलीम इराणी, सलीम नुरअली इराणी, रहीम मिर्झा, मरियम हैदर इराणी या पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे सर्वजण येथील इराणी गल्ली परिसरातील रहिवासी आहेत.फिर्यादीत नमूद केल्यानुसार, सन २०२४ पासून ते आजपर्यंत आरोपी सलमान सलीम इराणी व अली अब्बास सलीम इराणी यांनी फिर्यादीशी मैत्री करून त्याच्यासोबत अनैसर्गिक लैंगिक संबंध ठेवले. यावेळी त्याचे मोबाईलमध्ये व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले. सदर व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपींनी वारंवार बळजबरीने अत्याचार केल्याचा आरोप करण्यात आला आहे.तसेच, फिर्यादीच्या नातेवाईक मुलीने आरोपींविरोधात दिलेली तक्रार मागे घेण्याचा दबाव टाकण्यात आला. तक्रार मागे घेतली नाही तर फिर्यादीचा व्हिडीओ व्हायरल करू, अशी धमकी आरोपी सलीम नुरअली इराणी, रहीम मिर्झा, मरियम हैदर इराणी यांनी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. तक्रार मागे न घेतल्याने संबंधित व्हिडीओ व्हायरल करून फिर्यादीची बदनामी केल्याचाही आरोप आहे.या प्रकरणी भारतीय न्यायसंहिता कलम ११५ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५) तसेच पॉक्सो कायदा कलम ४, ६ व ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अप्पासाहेब हंडाळ करीत आहेत.

# तपासात मदत' करण्यासाठी लाखाची लाच?

## नगर तालुका पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक एसीबीच्या आला रडारवर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : गुन्ह्याच्या तपासात मदत करण्याच्या मोबदल्यात एक लाख रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी नगर तालुका पोलिस ठाण्यातील एका पोलिस उपनिरीक्षकाविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. या कारवाईमुळे जिल्हा पोलिस दलात खळबळ उडाली आहेत.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, नगर तालुका पोलिस ठाण्यात ११ मे २०२६ रोजी तक्रारदाराच्या मामासह अन्य १५ नातेवाईकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक जयेश मोतीलाल गांगुर्डे करत होते. तपासात मदत करण्यासाठी त्यांनी सुरुवातीला दोन लाख रुपयांची लाच मागितल्याची तक्रार १८ मे रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे प्राप्त झाली होती.

त्यानंतर विभागाने पडताळणी केली असता, पोलिस मुख्यालय परिसरात झालेल्या भेटीत संबंधित अधिकाऱ्याने तडजोडीअंती एक लाख रुपये स्वीकारण्याची तयारी दर्शवल्याचे निष्पन्न झाल्याचा दावा एसीबीने केला आहे.याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ च्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.मात्र, प्रत्यक्ष लाचेची रक्कम स्वीकारण्यात आलेली नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.या कारवाईत पोलिस निरीक्षक राजू आल्हाट यांनी सापळा अधिकारी म्हणून काम पाहिले.पोलिस निरीक्षक छाया देवरे या पुढील तपास करीत आहेत.

# स्व. ऋषिकेश छल्लारे

फक्त १७ वर्षांचे अल्पायुष्य लाभले, पण त्या छोट्याशा आयुष्यातही त्याने आपल्या कर्तृत्वाने, संस्कारांनी, प्रेमळ स्वभावाने आणि कुटुंबाप्रती असलेल्या निस्सीम जिव्हाळ्याने प्रत्येकाच्या मनात अढळ स्थान निर्माण केले.

ऋषिकेश हा केवळ मुलगा नव्हता, तर आई-वडिलांच्या आयुष्याचा आधार, कुटुंबाचा अभिमान आणि सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होता. त्याच्या स्वभावात प्रेम, कर्तव्य, आदर आणि संस्कार यांचा सुंदर संगम होता.

आईविषयी त्याच्या मनात अपार प्रेम, जिव्हाळा आणि गाढ आदर होता. आईचा प्रत्येक शब्द त्याच्यासाठी मोलाचा होता. तिचा मान राखणे, तिच्या कष्टांची जाणीव ठेवणे आणि तिच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे हेच जणू त्याचे ध्येय होते. वडिलांना प्रत्येक कामात मदत करणे, त्यांच्या जबाबदाऱ्या हलक्या करणे, त्यांचा शब्द कधीही खाली पडू न देणे आणि त्यांचा कायम सन्मान राखणे हे त्याच्या स्वभावाचे मोठेपण होते.

आजी-आजोबा यांच्याविषयीही त्याच्या मनात विशेष प्रेम, मान आणि आदर होता. त्यांच्या अनुभवांचा सन्मान करणे, त्यांची सेवा करणे आणि त्यांचे आशीर्वाद हेच त्याच्यासाठी खरे धन होते. मोठेबाबा व मोठे आई यांचाही मान-सन्मान जपत, घरातील प्रत्येक नात्याची किंमत समजून घेणारा ऋषिकेश हा संस्कारांचा खरा वारसदार होता.

शिक्षण घेत असतानाच घरातील सर्व कामांमध्ये हातभार लावत, कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्याने बारावी सायन्समध्ये ७६% गुण मिळवले आणि सीईटी परीक्षेत ९२% गुण संपादन करून आपल्या जिद्दीची, बुद्धिमत्तेची आणि मेहनतीची उज्ज्वल छाप पाडली. घरची जबाबदारी आणि शिक्षण या दोन्ही गोष्टी अत्यंत प्रामाणिकपणे सांभाळणारा ऋषिकेश अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरला.

आपल्या लाडक्या ऋतिका व माणसी दीदी या दोन्ही बहिणींवर त्याचे मनापासून प्रेम होते. त्यांच्या आनंदात आनंद मानणारा, त्यांची काळजी घेणारा आणि कायम त्यांच्या पाठीशी उभा राहणारा तो प्रेमळ भाऊ होता. मोठा भाऊ ओंकार यांच्याविषयीही त्याच्या मनात अपार प्रेम, आदर आणि जिव्हाळा होता. आपल्या



बहिण भाऊ यांना काळजीपूर्वक शाळेत सोडणे , आणणे अशी कामे तो जबाबदारीने करत होता. प्रत्येकाची कामे ऐकणे व घरातील थोर मोठ्यांचा आदर करणे हा त्याचा स्थायी स्वभाव होता.त्यामुळे आपल्या नात्यातील भाऊ-बहीण, आई वडील आजी आजोबा चुलते चुलती सर्वांचे त्याच्यावर विशेष प्रेम व त्याच्याबद्दल जिव्हाळा होता.

ऋषिकेश आयुष्याचा प्रत्येक क्षण प्रेम, कष्ट, माणुसकी, नाती आणि संस्कार जपत जगला. त्याचे निरागस हास्य, अभ्यासातील प्रामाणिकपणा, आई-वडिलांविषयीचा आदर, वडिलांना दिलेली साथ, मोठ्यांचा मान राखणारा स्वभाव आणि कुटुंबासाठीची धडपड आजही प्रत्येकाच्या हृदयात जिवंत आहे. अशोक उद्योग समूहाचे सर्वेसर्वा लोकनेते माजी आ. भानुदास मुरकुटे यांचे गणेश उर्फ किशोर छल्लारे निकटवर्तीय कार्यकर्ते असल्याने मुरकुटे व छल्लारे कुटुंबीयांचे कौटुंबिक व सलोख्याचे संबंध असल्याने मुरकुटे साहेब छल्लारे कुटुंबियांकडे आल्यानंतर नेहमी ऋषिकेश याची विचारपूस करत. त्याचप्रमाणे भोकर गावांमध्येही त्याचा लहान थोर थोरांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांशी प्रेमाने, आदराने वागणारा व सहकार्य वृत्तीचा स्वभाव होता. त्यामुळे अल्पवधीतच त्याने त्याचा मोठा मित्रपरिवार तयार केला होता. त्यामुळे गावातील तो सर्व लहान थोर महिला माता-भगिनी सर्वांचा लाडका होता.

तो आयुष्याने दूर गेला असला, तरी त्याचे संस्कार, त्याचे प्रेम, त्याचे कर्तृत्व आणि त्याच्या आठवणी या सदैव जिवंत राहतील. आज त्याच्या प्रथम पुण्यस्मरण दिनी त्याला भावपूर्ण श्रद्धांजली ईश्वर चरणी प्रार्थना की, ऋषीच्या पवित्र आत्म्यास शांती लाभो. काही माणसं आयुष्यात थोड्या काळासाठी येतात, पण आपल्या संस्कारांनी, प्रेमाने आणि कर्तृत्वाने कायम स्मरणात राहतात घराचा आधार, नात्यांचा मान आणि स्वप्नांचा अभिमान असलेली माणसं दूर गेली तरी हृदयातून कधीच दूर जात नाहीत भावपूर्ण श्रद्धांजली

स्व. ऋषिकेश छल्लारे (स्मृतीत सदैव जिवंत)

**(संकलन- अर्जुन राऊत, टाकळीभान प्रतिनिधी)**

# ईदचे नमाज पठाण झाल्यानंतर दोन गटात हाणामारी ; काही काळ तणाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : बकरी ईद निमित्त राहुरी येथील इदगाह मैदानात दि. २८ मे रोजी सकाळी मुस्लिम बांधवांकडून नमाज पठण झाल्यानंतर किरकोळ कारणावरुन दोन गटांत मारहाण झाल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे इदगाह मैदानावर काही काळ तणाव निर्माण झाला होता.

दि. २८ मे २०२६ रोजी सकाळी बकरी ईद निमित्त राहुरी शहरातील इदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांच्या वतीने नमाज पठण करण्यात आले. त्यानंतर मारहाण झाल्याची घटना घडली. दोन्ही गटाकडून परस्पर विरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली. अल्तमश दिलावर पठाण, वय ३० वर्षे, रा. खाटीक गल्ली, राहुरी, यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे कि, इदगाह मैदानावर नमाज पठण चालू असताना तेथे आरोपी आले व म्हणाले कि, तुम्ही लवकर नमाज का पाडता, असे म्हणुन बडबड करू लागले. तेव्हा अल्तमश पठाण त्यांना समजावुन सांगत असताना आरोपींनी त्यांना शिवीगाळ दमदाटी करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानुसार आरोपी मन्सुर मुहम्मद पठाण व शाहरुख लियाकत पठाण, दोन्ही रा. मुलनमाथा, राहुरी, या दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

तर मन्सुरखान मुहलखान पठाण, वय ३७ वर्षे, रा. मुलनमाथा, राहुरी, यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे कि, इदगाह मैदानावर नमाज पठण झाल्यानंतर मन्सुरखान पठाण म्हणाले कि, तुम्ही नमाज लवकर का घेतली, आमची नमाज बाकी राहिली. असे म्हणाल्याचा राग आल्याने आरोपींनी मन्सुरखान पठाण यांना शिवीगाळ करुन लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच जिवे मारुन टाकु, अशी धमकी दिली. त्यानुसार आरोपी अजिम ऊर्फ चिमू इनामदार, तौफिक ऊर्फ सोन्या सय्यद, उल्तमश ऊर्फ भाऊ पठाण, मुफ्ती अफजल, सर्व रा. खाटीक गल्ली, राहुरी. यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही घटनांचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक फौजदार तुळशीदास गिते हे करीत आहे.

# कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेसकडून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : कोपरगाव शहरात दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी 'बकरी ईद'चा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व मुस्लीम बांधवांनी ईदगाह मैदान व अक्सा मस्जिद येथे सामुदायिक नमाज पठण केले. याप्रसंगी कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने सर्व मुस्लीम बांधवांना 'बकरी ईद' च्या शुभेच्छा दिल्या.

कोपरगाव शहरात बकरी ईदचा सण अत्यंत उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. ईदनिमित्त नमाज पठण करण्यासाठी ईदगाह मैदानावर मुस्लिम बांधवांचा जनसागर उसळला होता. नमाज संपन्न झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी या ठिकाणी उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांची गळाभेट घेत त्यांना आमदार आशुतोष काळे यांच्या वतीने ईदच्या शुभेच्छा दिल्या. सामाजिक बांधिलकी जपतांना राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी या सणाचा आनंद मुस्लिम बांधवांसोबत द्विगुणित केल्याने कोपरगावात बंधुता, शांतता व एकोप्याचे दर्शन घडले.

याप्रसंगी नगरसेवक हाजी मेहमूद सय्यद, इम्तियाज अत्तार, माजी नगरसेवक अजीज शेख, फकीरमामु कुरेशी, नवाज कुरेशी, जावेद शेख, जुनेद शेख, हारुण शेख, मोहसीन सय्यद, नगरसेवक शैलेश साबळे, सोमनाथ आढाव, बाळासाहेब रुईकर, माजी नगरसेवक रमेश गवळी, दिनकर खरे, सचिन परदेशी, चंद्रकांत धोत्रे, सुनिल फंड, गणेश बोरुडे, संतोष दळवी आदींसह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## उंदिरगावच्या कन्येची मुंबई पोलिस दलात निवड

**शिरसगाव** : उंदिरगाव येथील प्रगतशील शेतकरी रामनाथ पा. सरोदे यांची नात व रविंद्र रामनाथ पा सरोदे यांची कन्या पूजा रविंद्र सरोदे हिची महाराष्ट्र पोलीस अंतर्गत मुंबई पोलीस पदावर निवड झाली आहे. सामान्य परिस्थितीतून पुढे येत पूजा हिने हे यश संपादन केले आहे. तिच्या यशामागे तिची जिद्द, अथक मेहनत आणि कुटुंबीयांनी घेतलेले कष्ट मोठे आहेत. कुटुंबाने अनेक अडचणींना सामोरे जात तिला शिक्षण दिले, तिच्या स्वप्नांना बळ दिले आणि प्रत्येक टप्प्यावर खंबीर साथ दिली. आई-वडिलांच्या त्याग, संस्कार आणि पाठिंब्यामुळेच पूजा हिने आज हे यश मिळवून कुटुंबासह संपूर्ण उंदिरगाव परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. तिचे हे यश ग्रामीण भागातील अनेक मुलींसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी मनः पूर्वक शुभेच्छा दिल्या.

## टाकळीभानला बकरीईद सण उत्साहात



**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे ईदगा मैदान येथे बकरीईद सण उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी हाजी मौलाना अहमद शेख, अनिस मौलाना, अश्फाक शेख व मुस्लिम बांधव उपस्थित होते. याप्रसंगी गावातील मान्यवरांनी सर्व मुस्लिम बांधवांना बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या .टाकळीभान गणेश खिंड रोडला असलेले ईदगा मैदान (कब्रस्तान )येथे मुस्लिम बांधवांनी सुंदर सुशोभीकरण केले. त्या ठिकाणी अनेक झाडांचे वृक्षारोपण करून त्याचे काळजीपूर्वक संवर्धन केले आहे. या पर्यावरण संवर्धनाच्या व जनजागृतीच्या उत्कृष्ट कार्याबद्दल ग्रामस्थांनी सर्व मुस्लिम बांधवांचे अभिनंदन व कौतुक केले आहे.

## बाभूळवेढे गावात कृषिदुतांचे गावकऱ्यांकडून स्वागत



**नेवासा** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषि महाविद्यालय, सोनईच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक अंतर्गत नेवासा तालुक्यातील बाभुळवेढे गावात दाखल झाले असून ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. कृषीदूत निलेश चौधरी, विनित मासाळ ,धिरज गाडेकर, अभिषेक गायकवाड, श्रेयश घोरपडे यांचा समावेश असून ते शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती देणार आहेत. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे , उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे , कार्यक्रम समन्वयक प्रा.अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी ,डॉ. संतोष चौगुले , प्रा. नरेंद्र दहातोंडे ,प्रा. दिशा चव्हाण व इतर तज्ज्ञांचे त्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. बापूसाहेब गायकवाड, राजेंद्र भडगने, दादासाहेब कोतकर, हर्षल कोतकर व बाभूळवेढे गावच्या गावकऱ्यांनी या कृषी दुतांचे स्वागत केले.

# विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने पुढे जावे : मंत्री राधाकृष्ण विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**झरेकाठी** : शैक्षणिक क्षेत्रातील वाढती स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा आणि विविध शिक्षण पद्धतींमुळे विद्यार्थ्यांवर मानसिक ताण वाढत असून, अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःची क्षमता ओळखून आत्मविश्वासाने भविष्याची वाटचाल करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ठरवहरज्ञीळीहपर तळज्ञहश झरींळश्र यांनी केले.

प्रवरा शिक्षण संस्थेच्या प्रवरा माध्यमिक विद्यालय, झरेकाठी येथे आयोजित इयत्ता दहावी व बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, सौ. शालिनीताई विखे, डॉ. भास्करराव खर्डे, विनायक देशमुख, ज्येष्ठ साहित्यिक संजय कळमकर तसेच संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, ग्रामीण भागात आधुनिक व कौशल्याधारित शिक्षण पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य प्रवरा संस्था करत आहे. मात्र, सध्या शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या विविध 'पॅटर्न'मुळे शिक्षण खर्च वाढत असून विद्यार्थ्यांवर मानसिक दबावही वाढत आहे. त्यामुळे शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेत त्यांना योग्य मार्गदर्शन करणे गरजेचे आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात वेगाने वाढणारे औद्योगिकीकरण लक्षात घेता आगामी काळात युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या संधींचा लाभ विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षणावर भर देण्यात येणार असून 'रतन टाटा इन्स्टिट्यूट'च्या माध्यमातून मोफत प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.


१९६४ मध्ये पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा भक्कम पाया रचल्याचे सांगत, आज प्रवरेचे विद्यार्थी जागतिक स्तरावर यश संपादन करत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. शिक्षणातील वाढते व्यापारीकरण चिंताजनक असल्याचे नमूद करत शाळा व महाविद्यालयांमध्ये दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांचा आढावा घेत नोकरी शोधणारा नव्हे, तर नोकरी देणारा विद्यार्थी घडवणे हे संस्थेचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्कारक्षम व कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यात येत असून पालकांसाठी 'सीईओ हेल्पलाइन' सुरू करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, दहावी परीक्षेत प्रवरा माध्यमिक विद्यालय झरेकाठी येथील अमर अंकुश वाणी याने प्रथम, गौरव कानिफनाथ वाणी याने द्वितीय तर कुमारी सोनम दादासाहेब हारदे हिने तृतीय क्रमांक मिळविला. याशिवाय प्रवरा परिसरातील विविध शाळांतील गुणवंत दहावी-बारावी विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शांताराम चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. लीलावती सरोदे यांनी केले.

## ना.विखेंच्या प्रयत्नामुळे चाऱ्यांच्या दुरुस्तीला वेग

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**पुणतांबा** : राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या प्रयत्नांमुळे पुणतांबा परिसरातील १९ चाऱ्यांच्या दुरुस्तीच्या कामांना वेग आला असून, त्यामुळे शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ना. विखे यांनी १२ नोव्हेंबर २०२५ रोजी वाकडी येथे महाराष्ट्र जलसिंचन सुधारणा योजनेअंतर्गत गोदावरी उजवा तट कालव्याच्या वितरण व्यवस्थेच्या नूतनीकरणाच्या कामाचे भूमिपूजन केले होते. सुमारे १४९ कोटी रुपयांच्या या योजनेत परिसरातील चाऱ्यांचे मजबुतीकरण, खोलीकरण, रुंदीकरण तसेच वितरण व्यवस्थेतील सुधारणा आदी विविध कामांचा समावेश आहे. कालव्याच्या ६५ ते १०७ किलोमीटर टप्प्यांदरम्यानची ही कामे पुढील दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

या कामांमुळे परिसरातील चाऱ्यांची वहन क्षमता वाढणार असून शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. परिसरातील कालवे, चाऱ्या व पोटचाऱ्या या सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या असून त्या अत्यंत अरुंद झाल्या आहेत. अनेक ठिकाणी अतिक्रमणे झाली असून काही पोटचाऱ्या पूर्णपणे बुजलेल्या अवस्थेत आहेत.

पुणतांबा हा टेल भागात येत असल्याने पाटपाण्याच्या बाबतीत येथील शेतकऱ्यांवर सातत्याने अन्याय होत असल्याची भावना व्यक्त केली जात होती. त्यामुळे शेती व्यवसाय अडचणीत आला होता. मात्र १७, १८ आणि १९ क्रमांकाच्या चाऱ्यांची मूळ नकाशाप्रमाणे दुरुस्ती, खोलीकरण व रुंदीकरण झाल्यास सिंचनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होणार असल्याचा विश्वास शेतकरी व्यक्त करत आहेत.

दरम्यान, परवापासून १९ क्रमांकाच्या चारीच्या टेल भागापासून दुरुस्तीच्या कामास सुरुवात झाली आहे. फोकलँड मशिनच्या सहाय्याने लगतचा मुरूम काढून दोन्ही बाजूंनी भर टाकण्याचे काम सुरू आहे. कामादरम्यान मोजणीदारांकडून मोजणी व लेव्हल काढून काम दर्जेदार होण्याकडे विशेष लक्ष दिले जात असल्याचे सांगण्यात आले.गोदावरी उजव्या कालव्यापासून १९ चारीची लांबी सुमारे पावणेआठ किलोमीटर असून या चारीअंतर्गत अंदाजे ४०० एकर क्षेत्र सिंचनाखाली येते. दरम्यान, कामाबाबत ठेकेदाराशी संपर्क साधून माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी अधिक माहिती देण्यास नकार दिला. त्यामुळे संबंधित चारीच्या कामाची रुंदी, खोली, उंची तसेच खर्चाची सविस्तर माहिती दर्शविणारा फलक तातडीने उभारावा, अशी मागणी लाभार्थी शेतकरी वर्गाकडून करण्यात येत आहे.

## बेलापूर - ऐनतपूर पंचक्रोशीत ईद-उल-अज्हा ' हर्षोल्लासात साजरी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : ईद-उल-अज्हा' अर्थात बकरी ईद बेलापुर ऐनतपूर पंचक्रोशीत मोठ्या भक्ति भावाने हर्षोल्लासात साजरी करण्यातआली. इस्लामी कालगणनेतील उर्दू महिना 'जिलहिज्जा' च्या दहा तारखेला बकरी ईद साजरी केली जाते. बुधवारी (दि. २७ ) संध्याकाळी चंद्रदर्शन घडले.

राज्यस्तरीय चांद समितीने बकरी ईद आज गुरुवारी साजरी केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार सकाळी सामुदायिकरीत्या मुस्लीम बांधवांनी पारंपरिक पध्दतीने नमाज पठण केले.येथे ईदगाह मैदानावर जामा मशिदीचे मुफ्ती यांनी नमाजचे सारथ्य केले. मशिदीचे प्रमुख विश्वस्त जाफरभाई आतार, अकबरभाई बागवान, रफीक बागवान, मोहसीन सय्यद, फिरोज दारूवाले, शफीक आतार प्रा. निजाम सय्यद आदींनी त्यासाठी परिश्रम घेतले. ऐनतपूर येथे मौलाना उबेदुदुल्लाहा यांनी नमाजचे साराध्य केले. आझादवाडी गोखले वाडी आठवाडी बेलापूर खुर्द रामगड गायकवाड बस्ती, सुभाष वाडी येथील शेकडो मुस्लिम समाज बांधवांनी येथे नमाज अदा केली.

बकरी ईद निमित्ताने सोशल मीडियावर राज्यस्तरापासून तर तालुका पातळीपर्यंतच्या राज्यकर्ते पुढारी मित्रपरिवार आप्तेष्ट अशा सर्वांनी मुस्लिम समाज बांधवास मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचा वर्षाव केला. मुस्लिम समाज बांधवांनी अशा सर्वांचे ऋण व्यक्त केले आहे.शासन आदेशासह धार्मिक शास्त्रीय नियमांचे (शरियत) काटेकोरपणे पालन करत धनिक मुस्लिमांनी 'कुर्बानी' केली. नमाज पठनानंतर मुफ्ती यांनी सामूहिक दुवा केली. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## एकादशीनिमित्त पैस खांबाची पो.नि.ढिकले यांच्या हस्ते महाआरती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : कमला एकादशीच्या निमित्ताने तीर्थक्षेत्र नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये सायंकाळी सहा वाजता पवित्र पैस खांबाची महाआरती वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली व नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या हस्ते पार पडली.

नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या हस्ते माऊलींचे मूर्तीमंत रूप असलेल्या पैस खांबाचे वेदमंत्राच्या जयघोष करत पूजन करून आरती करण्यात आली.यावेळी पोलीस कर्मचारी अजय साठे, बाबासाहेब वाघमोडे,संजय माने,संदीप बर्डे,जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे उपस्थित होते.महाआरतीनंतर अण्णासाहेब जाधव टेलर यांच्या वतीने उपस्थित भाविकांना साबुदाणा खिचडीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मंदिराचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे,कैलास जाधव, मंदिराचे जनसंपर्क अधिकारी आशिष कावरे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार व स्वागत करण्यात आले.

## कांगोणी गावाची रांगोळीतून प्रतिकृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**सोनई** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ अंतर्गत सोनई येथील कृषि महाविद्यालयातील कृषिकन्यांनी ग्रामीण जागरूकता व कृषि कार्यानुभव अंतर्गत कांगोणी गावाला भेट दिली.

यावेळी कृषिकन्यांनी ग्रामपंचायत, सोसायटी, मंदिर, जिल्हा परिषद शाळा, पाणी पुरवठा स्त्रोत, अंगणवाडी, पिक-पद्धती, मातीचे प्रकार, शेतीचे क्षेत्र माहिती घेत शेतकऱ्यांशी संवाद साधून गावाचा आढावा घेतला. कृषिकन्या प्रांजली हांगे, वेदश्री गोडसे,सुहानी गोसावी,धनश्री घुटे,भाग्यश्री लंघे,यांनी गावच्या तुळजाभवानी मंदिराच्या प्रांगणात रांगोळीच्या माध्यमातून गावाची प्रतिकृती नकाशाच्या स्वरूपात दर्शवली. यामध्ये गावाचा सामाजिक नकाशा,पीक पद्धती,पाण्याचे स्त्रोत व मृदा प्रकार इत्यादी नकाशांचा समावेश करण्यात आला होता. या प्रसंगी सोमनाथ कराळे, भाऊसाहेब शेळके, ज्ञानदेव वीरकर, ज्ञानेश्वर भुसारी, राजेंद्र ठोंबळ,माऊली रायकर,तेजस लोळगे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.वरील कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य सुनील बोरुडे, कार्यक्रम समन्वयक अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दिशा चव्हाण, प्रा.नरेंद्र दहातोंडे डॉ. संतोष चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले.

## मातापूर येथे ऊस उत्पादन तंत्रज्ञान व खरीप पूर्व मार्गदर्शन मेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील मातापुर येथे ऊस उत्पादन तंत्रज्ञान आणि खरीप पूर्व नियोजन या विषयांवर मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस उत्पादन तंत्रज्ञान व खरीप पूर्व मार्गदर्शन मेळावा उत्साहात पार पडला.

याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच, आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील यांच्या प्रयत्नातून मेळावा घेण्यात आला. यावेळी मृदशास्त्रज्ञ डॉ. सुभाष घोडके, उपविभागीय कृषि अधिकारी प्रविण गोसावी, तालुका कृषि अधिकारी उल्हास राक्षे, कृषि अधिकारी पौर्णिमा गाढे, उप कृषि अधिकारी रियाज शेख, कृषि सहाय्यक शेषराव देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉ. सुभाष घोडके यांनी ऊस उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन करताना ऊस पिकाचे विविध वाण, त्यांची वैशिष्ट्ये, आंतरमशागत, पाणी व्यवस्थापन आणि खत व्यवस्थापन सविस्तर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रादरम्यान शेतकऱ्याच्या विविध शंकांचे निरसनही करण्यात आले.

खरीप पूर्व नियोजन या विषयावर बोलताना प्रविण गोसावी यांनी भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार एल नीनोच्या प्रभावामुळे आगामी खरीप हंगामात सरासरीचे ८८% पाऊस होण्याची शक्यता असल्याचे सांगितले. यावेळी सहाय्यक कृषि अधिकारी तृप्ती तनपुरे यांनी बियाण्याची उगवण क्षमता तपासण्याबाबत प्रात्यक्षिक सादर केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रगतशील शेतकरी भागिनाथ शिरोळे यांनी आभार मानले.या कार्यक्रमासाठी परिसरातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तळेगाव दिघे येथे शनिवारी ऊस विकास मेळावा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**संगमनेर** : सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने शनिवार दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता तळेगाव दिघे येथील महाराजा लॉन्स येथे ऊस विकास मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूल मंत्री आणि माजी आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा मेळावा होणार असल्याची माहिती व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी दिली.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रात ऊस लागवड वाढीसाठी माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी जोर्वे, खांडगाव व साकुर येथे ऊस विकास मेळावे आयोजित करण्यात आले होते. त्याच पार्श्वभूमीवर तळेगाव व निमोन परिसरातील शेतकऱ्यांसाठी हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यास आमदार , डॉ. जयश्रीताई थोरात यांच्यासह विविध पदाधिकारी व कारखान्याचे संचालक उपस्थित राहणार आहेत. तसेच वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट, पुणे येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अशोक कडलग व डॉ. समाधान सुरवसे हे ऊस शेती व उत्पादन वाढीबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्यास तळेगाव व निमोन परिसरातील शेतकरी, सभासद, ऊस उत्पादक, युवक, महिला कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, संचालक मंडळ व कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## अधिक मासानिमित्त 'श्री ज्ञानेश्वरी चिंतन सोहळ्या'चे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : ग्रंथराज ज्ञानेश्वरी व अमृतानुभव या ग्रंथांचे रचनास्थान असलेल्या नेवासा येथील येथे अधिक मासानिमित्त रविवार दि. १ जून ते ७ जून दरम्यान संगीतमय श्री ज्ञानेश्वरी चिंतन सोहळा - स्थितप्रज्ञ दर्शन या आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सायंकाळी ७ ते ९ या वेळेत हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष व विश्वस्त मंडळाने दिली.

हिंदू धर्मामध्ये अधिक मास हा भगवान विष्णूचा भक्ती, कर्मयोग आणि आत्मचिंतनाचा पवित्र कालखंड मानला जातो. भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायातील ५४ व्या श्लोकात अर्जुनाने भगवान श्रीकृष्णांना स्थितप्रज्ञ कोण? असा प्रश्न विचारला आहे. त्यावर भगवान श्रीकृष्णांनी संत, महात्मे आणि ज्ञानी पुरुषांचे स्वरूप स्पष्ट करणारे विचार मांडले आहेत. संत ज्ञानेश्वर महाराजांनी याच विचारांचे ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायातील शेवटच्या ८६ ओव्यांमधून अत्यंत रसाळ व सखोल विवेचन केले आहे.

या दिव्य विचारांवर सात दिवस संगीतमय चिंतन व प्रवचन देवस्थानचे प्रमुख विश्वस्त महंत वेदांताचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के शास्त्री करणार आहेत. माऊली भक्तांनी या आध्यात्मिक ज्ञानसोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, विश्वस्त विश्वासराव गडाख, माधवराव दरंदले, रामभाऊ जगताप, ज्ञानेश्वर माऊली शिंदे, भिकाजी जंगले, कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव तसेच भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



# चार कोटींचा निधी खर्चूनही जलजीवन योजना रखडली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वि** : आश्वी बुद्रुक गावासाठी सन १९८३ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेली सुमारे एक लाख लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी आज अत्यंत धोकादायक अवस्थेत पोहोचली आहे.

टाकीच्या काँक्रिटमधील लोखंडी गज उघडे पडले असून ते पूर्णपणे गंजून कमकुवत झाले आहेत.

जिल्हा परिषद प्रशासनाने सुमारे दहा वर्षांपूर्वी ही टाकी पाडण्याचे आदेश दिले होते. मात्र गावासाठी पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था उभी राहिली नसल्याने आजही याच टाकीतून गावाला पाणीपुरवठा केला जात आहे.

ग्रामस्थांच्या मते, गावातील जलजीवन योजनेसाठी दोन पंचवार्षिक काळात मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाला होता.

पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सुमारे दोन कोटी रुपये तर माजी आमदार बाळासाहेब थोरात यांनीही सुमारे दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. तब्बल चार कोटी रुपयांचा निधी मिळूनही भ्रष्ट ठेकेदार, संबंधित अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांच्या निष्क्रियतेमुळे जलजीवन योजनेचे काम अद्याप अपूर्णच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

विशेष म्हणजे, ही जीर्ण पाण्याची टाकी भरलेली असताना जर एखादी दुर्घटना घडली तर त्याचा मोठा फटका परिसरातील नागरिकांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. टाकीपासून अवघ्या शंभर फुटांवर जिल्हा परिषद मुलींची शाळा असून शेकडो विद्यार्थिनी दररोज येथे शिक्षणासाठी येतात. तसेच परिसरात अनेक ग्रामस्थांची घरे असल्याने जीवित व वित्तहानी होण्याची भीती निर्माण झाली आहे.

या धोकादायक टाकीपासून अवघ्या वीस फुटांवर विद्यमान सरपंच नामदेव शिंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थ वास्तव्यास आहेत. त्यामुळे नागरिक रोज जीव मुठीत धरून राहत असल्याचे चित्र आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, टाकीच्या शेजारी जलजीवन योजनेंतर्गत नवीन पाण्याच्या टाकीचे काम सुरू असले तरी ते अत्यंत संथ गतीने सुरू आहे. अनेक दिवसांपासून काम रखडल्याने ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

गावकऱ्यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले आहे की, जलजीवन योजनेंतर्गत सुरू असलेल्या नवीन पाण्याच्या टाकीचे काम तातडीने पूर्ण करून जुन्या धोकादायक टाकीला त्वरित जमीनदोस्त करावे. अन्यथा भविष्यात या टाकीमुळे कोणतीही दुर्घटना घडून जीवित किंवा वित्तहानी झाल्यास संबंधित अधिकारी, ठेकेदार आणि पदाधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. दरम्यान, गावातील नागरिकांनी प्रशासनाने तातडीने पाहणी करून धोकादायक टाकीबाबत ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## पान १ वरुन

### ३० मेपासून तळपत्या उन्हात आमरण उपोषण

जीआर काढला जात नाही. मराठा-कुणबी मंत्रालय स्थापन करण्यासाठी किती वेळ लागणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. १९६७ पासून सरकारने मराठा समाजाचे वाटोळे केल्याचा आरोप जरांगे यांनी केला. समाजाचे नुकसान कोण भरून काढणार, असा सवाल करत त्यांनी आरक्षणासाठी मोर्चे, आंदोलने, कायदेशीर लढाई सर्व काही केल्याचे सांगितले. तरीही आरक्षण मिळाले नाही. फक्त मतांसाठी मराठा समाजाची गरज असते का, असा खडा सवालही त्यांनी केला. आता आरपार खेटण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. कायद्याच्या चौकटीत राहूनच हे उपोषण होईल. मराठा समाजाला यामुळे वाईट वाटू शकते, पण परिस्थितीमुळे कठोर भूमिका घेणे भाग पडत आहे. या पत्रकार परिषदेत मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आता शेवटच्या टप्प्यात जाण्याची तयारी दर्शवली आहे. सरकारकडून लवकरात लवकर सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त करतानाच, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र होईल, याचा इशाराही दिला आहे.

### रिलस्टार रोहिणी पाराध्ये यांची आत्महत्या!

वादातून आत्महत्या केली असावी अशी प्राथमिक माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. या घटनेनंतर रोहिणी यांचा नवरा निलेश पराध्ये यांनी मंगळवेढा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानूसार पोलिसांनी आस्कमीत मृत्यू अशी नोंद केली असली तरी त्यांच्या आत्महत्येचे गूढ कायम आहे. गेल्या वर्षभरापासून रोहिणी पाराध्ये आणि निलेश पाराध्ये हे नवरा-बायको विविध सामाजिक घटना आणि खाद्यपदार्थावर आधारीत रिलच्या माध्यमातून सोशल मीडियावर लोकप्रिय झाले होते. त्यांच्या या लोकप्रियतेचा फायदा घेऊन त्यांनी रत्नागिरी-नागपूर या राष्ट्रीय महामार्गावर खवैय्यासाठी ब्रह्मपुरी येथे हॉटेल ग्रामपंचायत हा व्यवसाय सुरू केला.

हॉटेल व्यवसायात ते स्थिर होऊन आणखी नवीन शाखा सुरू करत असताना अचानक पत्नी रोहिणी पाराध्ये यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलिस सध्या त्यांच्या आत्महत्येमागचे खरे कारण शोधत आहेत. तरी देखील हॉटेल व्यवसायाच्या शाखा वाढल्या. यातून आलेल्या तणावामुळे आणि वादामुळे रोहिणीयांनी रागाच्या भरात आत्महत्या केली असावी, असा अंदाज वर्तवला जात आहे.

### मुलाला जीवे मारण्याची धमकी देऊन महिलेवर भोंदू बाबाचा लैंगिक अत्याचार

शेतकरी महिलेचा १७ वर्षांचा मुलगा अनिकेत हा मतिमंद त्याच्यात सुधारणा होत नव्हती, तसेच शेतीत पिके येऊनही घरातील कर्ज फिटत नव्हते. याच दरम्यान पीडितेचा भाऊ बाळासाहेब रेपाळे याचेही वय होऊनही लग्न जमत नव्हते. कौटुंबिक अडचणींनी खचलेल्या या महिलेला रुई छत्रपती (ता. पारनेर) येथील राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे आणि त्यांची महिला सहकारी शोभा अविनाश तरटे (रा. म्हसणे, पारनेर) हे देवऋषी (देवभगत) असून ते अडचणींवर तोडगा काढतात, अशी माहिती मिळाली होती.पीडितेने २०२० मधील कोरोना काळापासून या भोंदूबानांकडे जाण्यास सुरुवात केली. त्यावेळी संशयितभोंदूबाने, तुमच्या कुटुंबाला मांढरदेवीच्या काळुबाईची बाधा आहे, त्यासाठी होमहवन व पूजा करावी लागेल, असे सांगितले. मुलाच्या उपचारासाठी ३ ते ४ लाख आणि भावाच्या लग्नासाठी दीड लाख रुपये खर्च येईल, असे सांगून त्यांनी पीडितेकडून मुलाचे व भावाचे फोटो तंत्र-मंत्र करण्यासाठी मागवून घेतले.सुरुवातीला पूजा साहित्याच्या नावाखाली शोभा तरटे हिने १० हजार रुपये घेतले. त्यानंतर पारनेर येथील मुख्य बाजारपेठेतील चौधरी कॉम्प्लेक्समधील घरात काळुबाईच्या फोटोसमोर होमहवन करून पीडितेला अंगारा व तीर्थ पिण्यास दिले. जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान पीडितेने गायत्री कॉम्प्युटर्स, पारनेर यांच्यामार्फत २ लाख ५६ हजार ६८४ रुपये ऑनलाईन आणि एप्रिल २०२६ मध्ये २ लाख रुपये रोख, असे एकूण ४ लाख ५६ हजार रुपयांहून अधिक रक्कम राजू दिवटे याला दिली. तसेच भावाच्या विवाहासाठी एकूण १ लाख ९३ हजार ५३० रुपये ऑनलाईन व रोख स्वरूपात उकळले. ही सर्व रक्कम पीडितेने 'येस बँक फायनान्स'कडून कर्ज काढून दिली होती.पैसे उकळल्यानंतरही मुलाच्या तब्येतीत फरक पडला नाही. यादरम्यान आरोपी राजू दिवटे हा पीडितेला मांढरदेव येथे पूजेसाठी चारचाकी गाडीतून नेत असताना त्याने गाडीत अश्लील वर्तन केले. त्यानंतर चौधरी कॉम्प्लेक्समधील फ्लॅटवर मुलाच्या उत्तम आयुष्यासाठी माझ्यासोबत शरीरसंबंध ठेवावे लागतील, नाहीतर तुझ्या मुलाच्या फोटोचे तुकडे करून काळुबाईच्या कोपाने त्याला मारून टाकीन, अशी धमकी दिली. मुलाच्या जिवाच्या भीतीने पीडितेने होकार दिला. संशयित राजू दिवटे याने पीडितेला गुंगीचे किंवा रंगीत पाणी पाजून जानेवारी २०२५ ते १ मार्च २०२६ दरम्यान तब्बल ८ ते १० वेळा तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला.काहीही फरक न पडल्याने जेव्हा पीडितेने आणि तिच्या भावाने आपले पैसे परत मागितले, तेव्हा आरोपींनी दोघांनाही शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. कुठेही तक्रार केली तर समाजात बदनाम करीन, सासरी नांदू देणार नाही, अशी धमकी पीडितेला दिली, तर भावाला एका रात्रीत तडफडून मारून टाकीन अशी तांत्रिक धमकी दिली. भीतीच्या छायेत असलेल्या पीडितेने अखेर आपल्या सासू-सासऱ्यांना हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी धीर दिल्यानंतर पीडितेने पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यासह बलात्कार, फसवणूक आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

### एमबीएचे शिक्षण घेणाऱ्या तिघा मित्रांचा दुर्दैवी अंत; लोणी परिसरात शोककळा

नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, काही विद्यार्थी गुरुवारी दुपारी चंद्रपूर परिसरात फिरण्यासाठी गेले होते. उन्हाच्या तीव्रतेमुळे काही जण तलावाच्या पाण्यात उतरले. सुरुवातीला सर्व काही सुरळीत वाटत असताना अचानक पाण्याखालील खोल खड्ड्यांचा अंदाज न आल्याने तिघेही गटांगळ्या खाऊ लागले. सोबतच्या मित्रांनी आरडाओरडा करत मदतीसाठी हाक मारताच परिसरातील नागरिक घटनास्थळी धावले. जीव वाचवण्यासाठी आटोकाट प्रयत्न झाले; मात्र पाण्याची खोली अधिक असल्याने आणि वेळ निघून गेल्याने तिघांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. घटनेनंतर तलाव परिसरात एकच गोंधळ उडाला होता. मित्रांच्या डोळ्यांसमोर घडलेली ही घटना अनेकांना हादरवून गेली. काही वेळापूर्वी हसत-खेळत असलेले मित्र अचानक कायमचे दूर गेल्याने उपस्थित विद्यार्थी अक्षरशः रडू कोसळले होते. घटनेची माहिती मिळताच लोणी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. स्थानिक नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आले. दरम्यान, संबंधित तलाव परिसरात कोणत्याही सुरक्षेच्या उपाययोजना नसल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू आहे. खोल पाण्याच्या ठिकाणी इशारा फलक, संरक्षण कठडे किंवा दक्षता व्यवस्था नसल्याने भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### शिवसेनेचा सहा जागांचा हट्ट कायम

म्हणाले की, आम्ही दोन दिवसांपासून दिल्लीत आहोत, त्याबाबत एवढा प्रश्न का पडला आहे? राज्यातील जनतेसाठी आणि महत्त्वाच्या योजनांसाठी केंद्राकडे भूमिका मांडणे हे आमचे कर्तव्यच आहे. महाराष्ट्रातील कांदा आणि ऊस उत्पादकांचे प्रश्न असोत किंवा जलजीवन मिशनचे प्रलंबित प्रकल्प. राज्याचे प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी आम्ही केंद्राकडे जाणार नाही तर कोणाकडे जाणार? अशी विचारणा त्यांनी केली.

### पेट्रोल-डिझेलवरील व्हॅट व सरचार्ज रद्द करा

जयंत पाटील यांनी केला आहे. अहिल्यानगरसह राज्यातील ग्रामीण भागात शेती आणि वाहतुकीसाठी डिझेलचा मोठ्या प्रमाणावर वापरकेला जातो. त्यामुळे इंधन दरवाढीचा फटका थेट शेतकऱ्यांना बसत आहे. ट्रॅक्टर, पंप, मालवाहतूक तसेच बाजारपेठेतील वाहतूक खर्च वाढल्याने कृषी उत्पादनांच्या किमतींवरही परिणाम होत आहे. त्यामुळे राज्य सरकारने नागरिकांना दिलासा देण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

# भारतीय मुसलमान देशाच्या मातीशी एकनिष्ठ -मुफ्ती रिझवान

## श्रीरामपुरात बकरी ईद भक्तिभावात साजरी



**गोवंश कुर्बानी नाही**

बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर मुस्लिम समाजातील सर्व प्रमुख कार्यकर्ते तसेच सर्व मशिदींचे मौलाना यांनी शासनाने गोवंश हत्या बंदीचा कायदा केलेला असल्याने त्या कायद्याचे पालन करीत गोवंश कुर्बानी न करण्याचा निर्णय जाहीर केला होता. तसेच कुरेशी समाजाने देखील याबाबत नकार दिला होता. त्यामुळे काल मोठ्या प्रमाणात बोकडांची कुर्बानी करण्यात आली. गोवंशाची कुर्बानी कुठेही झाली नाही.

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** - आपल्या देशातील भारतीय मुसलमान हे आपल्या देशाच्या मातीशी एकनिष्ठ आहेत.येथे सर्व कायद्याचे पालन करून ते आपले देश निष्ठा सिद्ध करीत असतात.कायद्याचे पालन करण्यातच सर्वांचा फायदा आहे. शासनाच्या सर्व नियमांचे पालन करून आपण बकरी ईद साजरी करीत आहोत.असे प्रतिपादन मदरसा हूदेबिया लिल बनात चे प्रमुख मोहम्मद रिजवानुल हसन यांनी ईदगाह मैदान येथे प्रवचन करताना केले. पैगंबर हजरत इस्माईल यांच्या त्याग व बलिदानाची आठवण करून देणारा ईद-उल अज्हा अर्थात बकरी ईद चा सण शहर व परिसरात मोठ्या भक्ती भावाने साजरा करण्यात आला. यानिमित्ताने इदगाह मैदानासह शहरातील अनेक मशीदीमधून ईदची नमाज अदा करण्यात आली. ईद-उल अजहा निमित्ताने सकाळी विविध मशीद मधून नमाज पठण करण्यात आले. सर्वात शेवटी ईदगाह मध्ये नमाज अदा करण्यात आली.जामा मशीदीत मौलाना मोहम्मद ईमदादअली यांच्या मार्गदर्शनाखाली मुफ्ती अतहर हसन,ईदगाहमध्ये शहर काजी सय्यद अकबर अली यांनी नमाजची इमामत केली.देशातील सर्व नागरिकांच्या भल्यासाठी,सुख-समृद्धीसाठी तसेच शांततेसाठी दुवा करण्यात आली. खबडी परिसरातील सईदाबाद येथील मदरसा मदिनतुल उलूम मखदुमियां येथील मखदुमी मस्जिदीत मुफ्ती मोहमद सानी मखदुमी यांनी नमाजची ईमामत केली.तर ऐनतपूर येथे ईदगाह मध्ये मुफ्ती उबेदुल्लाह यांनी ईदच्या नमाजची इमामत केली. या शिवाय मदिना मस्जिद,मक्का मस्जिद,गौसिया मस्जिद, मुसा मस्जिद, गरीब नवाज मस्जिद, जमादार मस्जिद, इनामुलहसन मस्जिद, कादरी मस्जिद, मदरसा रहमत ए आलम, फैजाने मदिना मस्जिद, तक्का मस्जिद, काबा मस्जिद, मस्जिद ए अत्तार, जैनब मस्जिद आदींसह इतर मशिदीतूनही नमाज आदा करण्यात आली. ईद निमित्ताने मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी जामा मशीद व ईदगाह येथे आमदार हेमंत तात्या ओगले,नगराध्यक्ष करण ससाणे,जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सचिन गुजर,सिद्धार्थ मुरकुटे,युवा नेते नीरज मुरकुटे,डॉ.दिलीप शिरसाठ, अण्णासाहेब डावखर, लकी सेठी, दिलीप नागरे, दीपक कदम, पोलीस उपाधिक्षक जयदत्त भवर, निरीक्षक नितीन देशमुख आदींसह विविध पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. जामा मशीद येथे आलेल्या मान्यवरांचे स्वागत नगरसेवक अंजुमभाई शेख,माजी नगरसेवक मुक्तार शाह,रज्जाकभाई पठाण,तनवीर रजा,मोहसीन बागवान यांनी केले तर इदगाह मध्ये ईदगाह कमिटीचे अध्यक्ष मुझफ्फर शेख, गफार पोपटिया, जिकर जुनानी, सलीम बाबुभाई आदींनी स्वागत केले. ईदच्या नमाज नंतर घरोघरी कुर्बानीचे विधी पार पडले. अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर,शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवला.

**पूल बांधण्याची मागणी**

ईदगाह परिसर,संजय नगर, रामनगर या भागातील नागरिकांच्या सोयीसाठी इतका जवळील जीवन चारीवर लोखंडी पुलाऐवजी मोठा पूल बांधण्याची मागणी इदगाह कमिटीचे अध्यक्ष नगरसेवक मुजफ्फर शेख यांनी आमदार हेमंत ओगले यांच्याकडे केली त्यांनी ती मागणी मान्य करून त्या ठिकाणी आमदार निधीतून मोठा पूल बांधून देण्याचे मान्य केले.

## खोटी माहिती देणाऱ्या तरुणावर गुन्हा, वाघापूर येथील घटना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले :** दारूच्या नशेत पत्नी व मेहुणे मारहाण करत असल्याची खोटी माहिती देत ११२ आपत्कालीन सेवा क्रमांकावर वारंवार कॉल करून पोलिस प्रशासनाची दिशाभूल करणाऱ्या वाघापूर येथील एका तरुणाविरुद्ध अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. रोहिदास गोरक्षनाथ बर्डे (वय ३६, रा. वाघापूर) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिस कॉन्स्टेबल मनोहर अशोक मोरे २५ मे रोजी अकोले पोलिस ठाण्यात कर्तव्यावर असताना रात्री ९.२६ वाजता ११२ नियंत्रण कक्षामार्फत रोहिदास बर्डे याचा कॉल प्राप्त झाला. यावेळी त्याने पत्नी व मेहुणे मारहाण करून शिवीगाळ करत असल्याची तक्रार केली. तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिस कॉन्स्टेबल मोरे यांनी संबंधिताशी संपर्क साधला असता, तो मोठमोठ्याने आरडाओरडा करू लागला.सहा महिन्यांपूर्वी पत्नीविरोधात दिलेल्या तक्रारीबाबत तो विचारणा करू लागला.मोरे यांनी त्याला संबंधित तपास अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला. मात्र, तो ऐकण्याच्या मनःस्थितीत नसल्याने कॉल बंद करण्यात आला. त्यानंतरही बर्डे याने वारंवार कॉल करून पोलिस यंत्रणेला त्रास देण्याचा प्रयत्न केला.रात्री सुमारे १.२५ वाजता पोलिस उपनिरीक्षक घोडे, पोलिस कॉन्स्टेबल गोरे व मोरे हे शासकीय वाहनाने वाघापूर येथे गेले. मारुती मंदिरामागे उभ्या असलेल्या बर्डे याने पोलिसांना पाहताच आरडाओरडा करत 'मी फाशी घेईन,' अशी धमकी दिली.पंचनामा करून त्याला ताब्यात घेण्यात स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत आले. त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय तपासणी केली असता, बर्डे याने मद्य अथवा अमली पदार्थांचे सेवन केल्याचे वैद्यकीय अहवालात नमूद करण्यात आले.या चौकशीत त्याने ११२ क्रमांकावर दिलेली माहिती खोटी असल्याचे चौकशीत निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल मनोहर मोरे यांच्या फिर्यादीवरून अकोले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## चोरीला गेलेली दुचाकी पोलिसांनी ५ तासात सापडली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील भाजप कार्यकर्ते व शहरातील मानाचा गणपती मंडळाचे पदाधिकारी यांच्या पुतण्याची घरासमोरून चोरीला गेलेली दुचाकी पोलिसांनी अवघ्या पाच तासात शोधून काढली. पोलिसांनी दोघा चोरट्यांनाही गजाआड केले.विशेष म्हणजे रात्री चोरीला गेलेली दुचाकी शोधण्यासाठी पोलिसांनी पहाटेपर्यंत शोधमोहीम राबविली.दिवस उजाडताच कार्यकर्त्याला दुचाकी आपल्या ताब्यात मिळाली.शहरातील रेव्हेन्यू कॉलनीतील भाजप कार्यकर्ते व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील मित्रमंडळाचे अध्यक्ष मनोज नवले पाटील यांचे पुतणे सागर नवले यांची दुचाकी बुधवारी रात्री चोरीला गेली. त्यांना पहाटे साडेतीन वाजता दुचाकी (क्र. एमएच १७ एएक्स ०४३४) चार चोरट्यांनी चोरून नेल्याचे लक्षात आले.मनोज नवले यांनी लगेच शहर पोलिस ठाण्याशी संपर्क साधला.भाजप कार्यकर्त्याने इतर सहकाऱ्यांनाही ही माहिती दिली.त्यामुळे तात्काळ पोलिस कर्मचारी त्यांच्या घरी दाखल झाले. पोलिसांनी लगेच पूर्ण परिसरात पेट्रोलिंग करून आरोपींची शोध मोहीम राबवली.परिसरामध्ये नाकेबंदी करत सीसीटीव्हीची मदत घेण्यात आली. पोलिस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अवघ्या काही तासांमध्ये चोरट्यांसह दुचाकी ताब्यात घेतली गेली. त्यानंतर चोरट्यांना चोप देण्यात आला.

## शंकरराव गडाख आज काय रणशिंग फुंकणार?

### तालुका शेतकरी मेळाव्याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई :** राज्याचे माजी मंत्री यांनी आज सकाळी साडेनऊ वाजता सोनई येथील मुळा पब्लिक स्कूल परिसरात तालुका शेतकरी मेळाव्याचे आयोजन केल्याने राजकीय वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. या मेळाव्यात गडाख नेमकी कोणती भूमिका मांडणार आणि काय एल्गार पुकारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यातील शेतकऱ्यांना मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत असून, या भव्य मेळाव्यासाठी हजारो शेतकरी उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. मेळाव्यात आधुनिक शेतीतील बदल, पाणी व्यवस्थापन, बाजारपेठेतील आव्हाने तसेच शेतीपूरक उद्योग याविषयी मार्गदर्शन होणार आहे.

विशेष म्हणजे, माजी मंत्री गडाख हे आज ५७ व्या वर्षात पदार्पण करत असून त्यांचा वाढदिवस शेतकरी व सर्वसामान्य मतदारांच्या उपस्थितीत साजरा होणार आहे. त्यामुळे या मेळाव्याला राजकीय आणि सामाजिक दृष्ट्या विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. तालुक्यातील विविध प्रश्न, आगामी राजकीय दिशा आणि शेतकरी हिताच्या मुद्द्यांवर गडाख काय भूमिका मांडतात, याबाबत कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. मेळाव्यानंतर तालुक्याच्या राजकारणात नवे संकेत मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## निधन वार्ता

### जयराम लकडे



सोमेश्वरनगर - करंजेपुल (ता बारामती) येथील जयराम भिवा लकडे यांच गुरुवार दि.२८ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. ते ७१ वर्षांचे होते. जयराम लकडे यांनी आपल्या कारकिर्दीत करंजे ग्रामीण पतसंस्था विद्यमान संचालक म्हणून कार्यरत ,श्री सोमेश्वर साखर कारखाना शेतकी विभागात (चीट बॉय) सेवानिवृत्त, करंजेपूल ग्रामपंचायत सदस्य म्हणून पद भूषवले होते. त्यांच्या पश्चात पत्नी सविता,दोन विवाहित मुले नात नातवंडे असा परिवार आहे सध्या आर्मी मध्ये कार्यरत असणारे रणजीत लकडे तसेच नुकतेच आर्मी सैन्य दलातून सेवानिवृत्त झालेले विक्रम लकडे यांचे ते वडील होत.

### दीपक दुग्गड



**श्रीरामपूर, :** येथील जैन समाजातील धडाडीचे कार्यकर्ते, व्यापारी दीपक हुकुमचंद दुग्गड (वय ५६) यांचे आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, मुली, पुतणे व जावई असा परिवार आहे. दीपक दुग्गड हे जैन समाजातील जेष्ठ स्वाध्यायी स्व. कांताबाई हुकुमचंद दुग्गड यांचे जेष्ठ चिरंजीव होते. आईकडून झालेल्या संस्काराप्रमाणे समाजात व राजकीय क्षेत्रात काम केले. ते शहर भाजपाचे माजी अध्यक्ष होते. तसेच व्यापारी राजेंद्र व तुषार दुग्गड यांचे थोरले बंधु होते. तसेच मर्चंटस् असोसिएशनचे सदस्य व विविध सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी म्हणून त्यांनी काम केले.

# नगरसेविका स्नेहल खोरे पती - पत्नीवर आघाव यांचे गंभीर आरोप

## अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार : केतन खोरे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** नगरसेविका स्नेहल खोरे व पती केतन खोरे या दोंघापासून माझ्या कुटूंबास जीवीतास धोका असून, माझ्या कुटूंबास पोलीस संरक्षण मिळावे,तसेच त्यांचे सुरू असलेल्या तीन स्मार्ट कार्ड केंद्राची मान्यतेच्या कागदपत्रांची सखोल त्वरित चौकशी करावी,यामागणी करिता श्रीरामपूर येथील ज्येष्ठ नागरिक ज्ञानदेव किसन आघाव (गुरुजी) यांनी गुरुवारी (दि.२८) मे रोजी महात्मा गांधी पुतळ्याजवळ उपोषण सुरू केले.याबाबत, सविस्तर माहिती अशी की, माझ्या मुलाचे नाव कैलासपती आघाव हे असून यांचे हरिकमल प्लाझा नगरपालिका शेजारी अग्निपंख या नावाने एस.टी.महामंडळ स्मार्ट कार्ड सेतू सेवा केंद्र सुरू आहे.आमच्या गाळ्यासमोर नगरसेविका स्नेहल खोरे व केतन खोरे यांचेही आधार केंद्र, सेतू केंद्र,एस.टी.महामंडळ स्मार्ट कार्ड केंद्र चालवितात.

खोरे पती-पत्नीने काहीतरी हेतू डोळ्यासमोर ठेवून आम्हाला दमबाजी करण्याचा प्रकार करीत असल्याचे आघाव यांचे म्हणणे आहे. या दोघांनी येवून गाळ्यासमोर माझ्या मुलास दमबाजी करत स्मार्ट कार्ड एजन्सी आम्हाला विचारून का घेतली नाही? तुमची एजन्सी आम्ही चालू देणार नाही, एजन्सी बंद करा,नाहीतर, तुमचे हातपाय तोडू,व श्रीरामपूरात राहू देणार नाही, तुमचा खून करू टाकू अशी,धमकीवजा दिली.दोघांचे गाळे समोरासमोर असल्याने आमच्याकडे येणाऱ्या ग्राहकांना हाताने खूणवून व मोठेमोठ्याने ओरडून बोलवून घेतात, आमच्याकडे येणारे ग्राहक आमच्या दुकानासमोरून ओढून नेतात.जिन्याच्या पायऱ्यांवर उभे राहून लोकांना अडवतात.येथे ते हाताने खूना करून आमचेच ग्राहक बोलवून घेतात.त्यामुळे नगरसेविका खोरे व केतन खोरे या दोघांनी माझ्या मुलाला कैलासपती आणि कुटूंबास मानसिक त्रास देत आहेत. त्यामुळे आमचे मानसिक संतुलन बिघडले आहे.तरी, नगरसेविका खोरे व पती केतन खोरे यांना जबाबदार धरण्यात यावे.या दोघांपासून माझ्या कुटूंबाला धोका असून कुटूंबास पोलीस संरक्षण मिळावे,अशी मागणी आघाव यांनी केली.खोरे यांच्या तीनही सेतू केंद्रांची मान्यतेच्या कागदपत्रांची व परवानगी कोणत्या ठिकाणी घेतली, सोबत हे केंद्र कोठे चालवितात, यांची सखोल चौकशी करून त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी,अशी मागणी तक्रारदार आघाव यांनी निवेदनाद्वरे प्रसिद्धी दिलेल्या पत्रकातून सागितले.

**सदरच्या निवेदनाची दखल घेतली.त्या अनुषंगाने आवश्यक ती चौकशी सुरू आहे. नियमानुसार उचित कारवाई होईल.असे महसुलच्या अधिकाऱ्यानी सांगितले.**

**अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार- केतन खोरे**

**खोट्या व्यावसायिक तक्रारी करून आमची बदनामी करणाऱ्यांवर अब्रूनुकसानीचा दावा दाखल करणार आहे.व्यवसायाचा आणि नगरसेविका स्नेहल खोरेचा कोणताही संबंध नसून, फक्त राजकीय बदनामीसाठी हा स्टंट केल्याचे खोरेंनी सांगितले.**

## आंतरराष्ट्रीय उपक्रमांसाठी रावी हांडेची निवड



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** संगमनेर महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. राहुल हांडे यांची कन्या रावी हांडे हिने गुणवत्तेच्या बळावर दोन प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमांसाठी निवड करण्यात आली आहे.

रावी हांडे सध्या मँचेस्टर विद्यापीठात एलएलबीच्या द्वितीय वर्षात शिक्षण घेत आहे. तिची प्रथम निवड दक्षिण-पूर्व युरोपातील स्वतंत्र राष्ट्र कोसोवो येथे आयोजित करण्यात येणाऱ्या कोसोवो आंतरराष्ट्रीय उन्हाळी अकादमी २०२६ या प्रतिष्ठित उपक्रमासाठी झाली आहे. या उपक्रमासाठी जगभरातून तब्बल ७५० विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यातून केवळ २० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये रावी हांडे हिचा समावेश आहे.रावी ही १० ते १९ ऑगस्ट २०२६ दरम्यान कोसोवो येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमात सहभागी होणार आहे. तिच्या उल्लेखनीय गुणवत्तेची दखल घेत तिला २००युरोंची गुणवत्ता धारित शिष्यवृत्ती देखील प्रदान करण्यात आली आहे.याशिवाय तिची निवड चायनीज विद्यापीठ हाँगकाँग येथील आंतरराष्ट्रीय संशोधन उपक्रमा साठीही झाली आहे. जगातील आशा काही नामांकित विद्यापीठांमधून अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांमधून केवळ १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून त्यात रावी हांडे हिने स्थान मिळवले आहे. या उपक्रमांतर्गत ती २१ जून ते ५ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आंतरराष्ट्रीय कायद्याशी संबंधित संशोधन कार्य करणार आहे. हाँगकाँग ते कोसोवो अशा जगाच्या दोन वेगवेगळ्या टोकांवर आपल्या गुणवत्तेची छाप उमटवत रावी हांडे भारतासह महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करत आहे. संगमनेरच्या या गुणवंत लेकीच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

**नशिबाची परिक्षा**

**शुक्रवार दि .२९ मे २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२७ ४६० ५५० | ०-४ | १४९ २४८ २२० | जोड ०७-३४--१८-२९-४५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १६९ २६८ ३३० | ६-९ | १८० २८९ ३६० | जोड ६१-२९-४३-७५-९८ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६ ४७० ११९ | १-० | १३६ २३५ ३३४ | जोड १२-६०-४५-८९-०३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६


## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 566 79 270 | 370 04 239 | | | |

द•ख•ल

## बकरी ईद सण उत्साहात साजरा



**निघोज :** निघोज व परिसरात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद सण उत्साहात साजरा केला. यावेळी परिसरातील ईदगाह मैदानावर सकाळी १० वाजता सर्व मुस्लिम समाज बांधव एकत्र आले व त्यांनी नमाज पठण केले तसेच एकमेकांना बकरी ईद सणाच्या शुभेच्छा दिल्या. निघोज आणी परिसरात हिंदू व मुस्लिम समाज बांधव सर्व सण मोठ्या एकोप्याने साजरे करीत असतात. यावेळी हिंदू समाज बांधवांनी बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## पृथ्वी दानवेचे शिष्यवृत्ती परीक्षेत यश

**करंजी :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत श्री संत तनपुरे



बाबा विद्यालय खांडगाव ता. पाथर्डी या विद्यालयाचा विद्यार्थी पृथ्वी मनेश दानवे याने मोठे यश प्राप्त केले असून तो या शिष्यवृत्ती पात्र झाला आहे. त्याचे परिसरात कौतुक करण्यात येत आहे . या विद्यार्थ्याचे संस्थेचे अध्यक्ष हभप गुरुवर्य बद्रीनाथ महाराज तनपुरे, सौ सत्यभामा तनपुरे ,अनंत महाराज तनपुरे, आबासाहेब तोडमल, राजेंद्रजी पाचे, प्राचार्य भास्कर कासार, सर्व शिक्षक व शिक्षक कर्मचारी खांडगाव ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले आहे.

## स्नेहा लांडगे हिची 'आयआयएम रोहतक'मध्ये निवड

**शेवगाव :** येथील प्रतिष्ठित 'आबासाहेब काकडे शैक्षणिक समूह' संचलित काकडे विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. स्नेहा बाबासाहेब



लांडगे हिने राष्ट्रीय पातळीवर घवघवीत यश संपादन करत संस्थेच्या आणि शेवगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. देशातील व्यवस्थापन क्षेत्रातील सर्वोच्च संस्थांपैकी एक असलेल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' येथे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी स्नेहाची निवड झाली आहे.तिच्या या यशाबद्दल जिल्हाभरातुन कौतुक होत आहे. स्नेहाचे इयत्ता बारावीपर्यंतचे संपूर्ण शिक्षण आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहातील विद्यालयातून झाले आहे. येथेच तिच्या शैक्षणिक प्रगतीचा पाया रचला गेला. त्यानंतर तिने पुणे येथील नामांकित 'डी. वाय. पाटील कॉलेज'मधून संगणकशास्त्र या विषयात आपली पदवी पूर्ण केली. पदवीनंतर तिने आपले लक्ष्य 'आयआयएम' प्रवेशावर केंद्रित केले. देशातील अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक मानल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश पूर्व चाचणी परीक्षेत तिने उत्तम गुण मिळवले. त्यानंतर झालेल्या अत्यंत काठिण्य पातळीच्या मुलाखतीमध्येही तिने आपल्या बुद्धिमत्तेची व कौशल्याची छाप पाडत या प्रतिष्ठित महाविद्यालयात आपले स्थान निश्चित केले.अभिमानाची बाब अशी की रोहतक येथील कॉलेजसह तिला देशातील विविध पाच प्रसिद्ध खखच् कॉलेजचे प्रवेशासाठी कॉल आलेले होते मात्र तिने रोहतकची निवड केली.

## ६४ घरांवर वर्चस्वासाठी बुद्धिबळपटूंची बुद्धीची लढत



**अहिल्यानगर :** मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली बुद्धिबळ स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी बुद्धिबळपटूंमध्ये चुरशीचे सामने रंगले. रशियन ग्रँडमास्टर पेट्र किरियाकोव यांच्यासह भारतभरातून आलेल्या नामांकित खेळाडूंनी आपल्या बुद्धीचे कौशल्य दाखवत ६४ घरांवर वर्चस्व मिळवण्यासाठी डावपेच आखले. विशेष म्हणजे अवघ्या लहान वयातील स्पर्धकांपासून ते ९२ वर्षीय ज्येष्ठ बुद्धिबळपटूपर्यंत विविध वयोगटातील खेळाडूंनी स्पर्धेत सहभाग घेत लक्षवेधी कामगिरी केली. स्पर्धास्थळी प्रत्येक पटावर खेळाडूंचे एकाग्रचित्ताने सुरू असलेले सामने आणि प्रेक्षकांचा उत्साह यामुळे बुद्धिबळप्रेमींना पर्वणी अनुभवायला मिळत आहे.

## जयहिंद सैनिक संस्थेच्या वतीने डॉ.सुनील सकट व मच्छिंद्र गव्हाणे यांचा भव्य सत्कार



**अहिल्यानगर :** जयहिंद माजी सैनिक बहुउद्देशीय सेवाभावी संस्था महाराष्ट्र राज्याच्या वतीने दलित मित्र डॉ. सुनील सकट व गोपाळ समाज भूषण मच्छिंद्र गव्हाणे यांनी विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल तसेच समाजसेवा व पर्यावरण क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल दिल्ली येथील मॅजीक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन द्वारा मानद डॉक्टरेट पदवी मिळाली. याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मेजर निळकंठ उल्हारे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांच्या वतीने सह्याद्री चौक एमआयडीसी अहिल्यानगर येथे गोपाळ समाज भूषण मच्छिंद्र गव्हाणे या दोघांचा मानाचा फेटा बांधून शॉल व बुके देऊन भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी नवनागापूर ग्रामपंचायत सदस्य बंडूनाना सप्रे, उद्योजक बाळासाहेब मोरे, अवंती क्रेनचे मालक अनिलशेठ भिंगारे, त्रिदल सैनिक संघ निंबळकचे मारुती ताकपेरे मेजर,लहू सुलाखे मेजर, सोन्याबापु शिंदे मेजर,शानदार फेटे बांधणारे निलेश ताकपेरे,दीपक धनगर,ओंकार गंजी,शरद गव्हाणे,राजू पवार,नवनागापूर साईबाबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष आकाश कोल्हाळ,संकेत गुंजाळ,सागर कुर्हे,गोरख गव्हाणे,ज्ञानेश्वर कानडे,राम भारस्कर,सोमनाथ एडके आदी मान्यवर उपस्थित होते. शेवटी जयहिंद माजी सैनिक संस्थेच्या वतीने मेजर लहू सुलाखे यांनी आभार व्यक्त केले.

# अहिल्यानगरात बकरी ईद उत्साहात साजरी



## शांतता व राष्ट्रीय एकात्मतेची प्रार्थना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरासह जिल्ह्यात मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईद (ईद उल अज्हा) गुरुवारी (दि.२८ मे) मोठ्या उत्साहात साजरी केली. शहरातील ईदगाह मैदान येथे सकाळी ९:३० वाजता ईदची नमाज मौलाना नदिम अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी शहरातील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नमाजच्या प्रारंभी धार्मिक व्याख्यान, नमाजनंतर खुदबा व त्यानंतर मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज अदा केली. देशात शांतता, समृध्दी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी प्रार्थना करण्यात आली. सकाळी ७ वाजल्यापासून शहरातील विविध मशिदी मधून बकरी ईदची नमाज अदा करण्यात आली. ईदनिमित्त प्रमुख नमाज पठण कोठला येथील ईदगाह मैदानात झाले. मुस्लिम बांधवांनी एकमेकांच्या भेटी-गाठी घेऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या. तर कुर्बानी करताना इतर धर्मियांना त्रास होणार नाही आणि गोवंश जनावरांची कुर्बानी न करण्याच्या समाजबांधवांना विशेष सूचना करण्यात आल्या.

पोलीस प्रशासनाच्या वतीने खबरदारी म्हणून ईदगाह मैदानसह शहरातील चौका-चौकात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोठला येथून जाणारी वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळविण्यात आली होती. नमाजनंतर शहरातील विविध कब्रस्तान व दर्गामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. बकरी ईद निमित्त तीन दिवस म्हणजे गुरुवार पासून शनिवार पर्यंत घरोघरी कुर्बानी केली जाणार आहे. सोशल मीडियावर देखील बकरी ईदच्या शुभेच्छांचा पाऊस पडला होता.

## नगर शहराचा ५३६ वा स्थापना दिवस साजरा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** (पूर्वीचे अहमदनगर) शहराचा ५३६ वा स्थापना दिवस गुरुवारी (दि. २८ मे) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शहराचे संस्थापक अहमद निजामशहा यांच्या बागरोजा येथील कबरीवर आय लव्ह अहमदनगर फौंडेशनच्यावतीने चादर अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहराच्या ऐतिहासिक वैभवाची आठवण करून देत नगरच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरेला उजाळा देण्यात आला.

या कार्यक्रमास आय लव्ह अहमदनगर फाऊंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी, नगरसेवक हाजी शैबाज, शैबाज बॉक्सर, शहानवाज शेख, फिरोज पठाण, फिरोज आर्किटेक, तनवीर तांबोळी, आयान शेख, मुजम्मिल शेख, शाहिद मोमीन, जीशान शेख, साहिल सय्यद आदींसह मोठ्या संख्येने इतिहासप्रेमी व युवक उपस्थित होते. उपस्थितांनी शहराच्या स्थापनेचा इतिहास आणि नगरच्या वैभवशाली परंपरेबद्दल अभिमान व्यक्त केला.

जहागीरदार म्हणाले की, शहराला लाभलेला ऐतिहासिक वारसा हे प्रत्येक नगरकरासाठी अभिमानाचे प्रतीक आहे. संस्थापक अहमद निजामशहा यांच्या दूरदृष्टीमुळे हे वैभवशाली शहर उभे राहिले. एकेकाळी कैरो आणि बगदादसारख्या ऐतिहासिक शहरांच्या तोडीचे महत्त्व आणि ओळख आपल्या शहराला होती. जगातील फार कमी शहरांचे स्थापना दिन निश्चित माहित आहेत आणि त्यापैकी एक शहर म्हणजे अहमदनगर होय. अहमद निजामशहा यांनी २८ मे १४९० रोजी या शहराची स्थापना केली होती, याचा नगरकरांना अभिमान असल्याचे त्यांनी सांगितले.

मौलाना शफिक कासमी यांनी शहराच्या स्थापना दिनानिमित्त शुभेच्छा देताना नगरच्या ऐतिहासिक घटनांचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या माध्यमातून शहराच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करण्यात आले.

## सावरकरांची देशभक्ती युवकांना प्रेरणादायी : बारस्कर



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने चौपाटी कारंजा येथील सावरकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे महान स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, लेखक आणि समाजसुधारक होते. लहानपणापासूनच त्यांच्या मनामध्ये प्रखर देशभक्तीची भावना होती. इंग्रजांविरुद्ध लढा उभारण्यासाठी त्यांनी अनेक युवकांना प्रेरित केले तसेच अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेची स्थापना करून देशाच्या स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा दिली. देशाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष करत असताना इंग्रजांनी त्यांना अटक करून सेल्युलर जेलमध्ये काळ्यापाण्याची शिक्षा सुनावली. त्यांची देशभक्ती आजच्या युवकांना ऊर्जा व प्रेरणा देणारी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर यांनी केले. सावरकर जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात संपत बारस्कर यांनी सावरकरांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांवर प्रकाश टाकला. देशभक्ती, त्याग आणि राष्ट्रसेवेची भावना आजच्या पिढीने आत्मसात करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमास नगरसेवक प्रकाश भागानगरे, नगरसेवक रवींद्र बारस्कर, युवक शहर जिल्हाध्यक्ष सूरज कोतकर, कार्याध्यक्ष ऋषिकेश रासकर, रवी दंडी, आदिनाथ येडे, आनंद राठोड, मयूर जोशी, बाबू बारस्कर, संदीप गोसावी, अजिंक्य गुरव आदींसह मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक प्रकाश भागानगरे आणि नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या नावाचा जयघोष केला. संपूर्ण परिसरात देशभक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.

## विजय भालसिंग यांना राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** येथील सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग यांना सामाजिक, धार्मिक व पर्यावरण क्षेत्रात सुरु असलेल्या निस्वार्थ कार्याबद्दल महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेच्या वतीने राष्ट्रीय कार्य दर्पण सन्मान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

शनिवार दि.१३ जून रोजी मुंबई येथे राष्ट्रीय कार्य दर्पण गौरव संमेलन होणार आहे. या संमेलनात विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते भालसिंग यांना पुरस्काराने सन्मानित केले जाणार असल्याची माहिती संमेलनाचे आयोजक सलमा एन.खान यांनी दिली.

विजय भालसिंग सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, निसर्ग व पर्यावरण क्षेत्रात गेल्या दोन दशकापासून योगदान देत आहेत. वाळकी (ता. नगर) येथील असलेले भालसिंग एसटी बँकेची नोकरी सांभाळून निस्वार्थपणे योगदान देत असून, कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान व वर्गणी न घेता स्वखर्चातून सामाजिक कार्य करत आहे. वृक्षरोपण व संवर्धनासाठी ते सातत्याने कार्य करत आहे.

उन्हाळ्यात पशु-पक्ष्यांना जगणे सुसह्य व्हावे म्हणून पाणवठे तयार करुन पाणी उपलब्ध करणे, विविध परिसरात पक्ष्यांसाठी झाडांवर धान्य व पाण्याची भांडी बसविणे, सर्वत्र वाढत चाललेल्या सिमेंटच्या जंगलामुळे पशु-पक्ष्यांचे अस्तित्व राहण्यासाठी नारळाच्या साली पासून कृत्रिमरीत्या पक्ष्यांसाठी बनवलेले घरटी बसविणे आदी निसर्ग व पर्यावरणपुरक उपक्रम ते सातत्याने राबवित आहेत. दरवर्षी आषाढी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीची सेवा करत आहे.

## मुस्लिम समाजाचा गोसंरक्षणासाठी पुढाकार!

### मुस्लिम युवकांकडून गोशाळेत चारा वाटप; धार्मिक सौहार्दाचा अनोखा संदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** बकरी ईद (ईद-उल-अजहा) या पवित्र सणानिमित्त शहरात धार्मिक एकात्मता, सामाजिक सलोखा आणि मानवतेचा अनोखा संदेश देणारा उपक्रम गुरुवारी (दि. २८ मे) पार पडला. मुस्लिम समाजातील युवकांनी ईदच्या नमाजनंतर थेट गोशाळेत जाऊन गाईंना चारा वाटप करत समाजासमोर बंधुभावाचे एक वेगळे उदाहरण उभे केले. या उपक्रमामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या असून, धर्म वेगळे असले तरी माणुसकी एकच असते, हा संदेश देण्यात आला.

कुष्ठधाम रोड, बारस्कर मळा येथील सतनाम साक्षी गोशाळेत आय लव्ह अहमदनगर फौंडेशनच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. ईदच्या आनंदात सहभागी होत मुस्लिम युवकांनी गोमातेला चारा अर्पण करून धार्मिक एकात्मतेची भावना जपली. यावेळी फौंडेशनचे अध्यक्ष साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी, नगरसेवक हाजी शैबाज, शैबाज बॉक्सर, शहानवाज शेख, फिरोज पठाण, फिरोज आर्किटेक, तनवीर तांबोळी, आयान शेख, मुजम्मिल शेख, शाहिद मोमीन, जीशान शेख, साहिल सय्यद यांच्यासह गोशाळेचे सचिव सीए शंकर अंदानी, मुकेश माधवाणी व युवक उपस्थित होते.

ईदसारख्या धार्मिक सणाच्या दिवशी मुस्लिम समाजातील युवक गोशाळेत चारा घेऊन पोहोचल्याने उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. समाजात अनेकदा अफवा आणि गैरसमजांच्या माध्यमातून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना, या उपक्रमाने मात्र हिंदू-मुस्लिम ऐक्याचे जिवंत उदाहरण समोर आणले. भारत हा कृषीप्रधान देश असून गाईला येथे विशेष धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व आहे. याच पार्श्वभूमीवर गाईला 'राष्ट्रीय पशू' घोषित करण्यात यावे, अशी मागणी मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळाने नुकतीच जिल्हा प्रशासनाकडे केली होती. त्या मागणीला अधिक बळ देण्यासाठी ईदच्या दिवशी गोशाळेत चारा वाटप करण्यात आले.

यावेळी साहेबान जहागीरदार, मौलाना शफिक कासमी यांनीही ईदच्या दिवशी पार पडलेल्या या उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, इस्लाम धर्म मानवतेचा, दयाळूपणाचा आणि सहअस्तित्वाचा संदेश देतो. समाजात शांतता आणि बंधुभाव टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे शहरात धार्मिक सलोखा आणि सामाजिक ऐक्याचा सकारात्मक संदेश पोहोचला आहे.

## पंधरा लाखाचे सोन्याचे दागिने केले परत

### राजेश वराळ यांचा प्रामाणिकपणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**निघोज :** जी एस महानगर बँकेच्या शिरुर शाखेतील ग्राहक छाया बाळासाहेब शेळके यांचे बँकेत राहिलेले ९ तोळे सोन्याचे दागिने प्रामाणिकपणे परत केल्याबद्दल बँकेत कार्यरत असलेले राजेश रामचंद्र वराळ यांचा बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याबाबत अधिक माहिती अशी आहे की छाया बाळासाहेब शेळके या जी एस महानगर बँकेच्या शाखेत नेहमीप्रमाणे लॉकरची चौकशी करण्यासाठी आल्या होत्या. मात्र लॉकर ऑपरेट केल्यानंतर त्यांचे नऊ तोळ्याचे दागिने मात्र नकळत खाली पडले. त्या लॉकर बंद केल्यानंतर निघून गेल्या. त्यानंतर वराळ हे लॉकर रुममध्ये कामानिमित्त गेले असता हे दागीणे खाली पडले असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. वराळ यांनी हे दागिने घेऊन तातडीने शाखाधिकारी बाबाजी लामखडे यांच्या लक्षात ही बाब आणून दिली. नुकत्याच छाया शेळके याच या लॉकर रुममध्ये गेल्याचे लामखडे साहेब यांच्या लक्षात आल्याने त्यांनी तातडीने शेळके यांना बँकेत पुन्हा बोलावून घेऊन लॉकरची पुन्हा तपासणी करण्याची सुचना केली यावेळी मात्र दागीणे नाहीत हे त्यांच्या लक्षात आल्याने लामखडे यांनी लगेच ते दागीणे त्यांना दाखवले याच वेळी बँकेच्या चेअरमन गीतांजली शेळके या शाखेला भेट देण्यासाठी येणार होत्या. त्या आल्यानंतर त्यांच्या हस्ते हे दागीणे छाया शेळके यांना देण्यात आले. चेअरमन गीतांजली शेळके यावेळी म्हणाल्या जी एस महानगर बँकेचे सर्वच अधिकारी व कर्मचारी अतिशय परिश्रम घेऊन प्रामाणिकपणे बँकेची सेवा करतात म्हणून बँकेचा नावलौकिक देशभरात झाला आहे. राज्यातील सर्वच शाखांमध्ये ठेवी, कर्जवाटप,वसुली यामध्ये जी एस महानगर बँकेचे नाव सहकार चळवळीत घेतले जाते याला सर्वस्वी कर्मचारी व अधिकारी यांचे योगदान मोठे असून शिरुर शाखेचा नावलौकिक पुणे जिल्ह्यात असून शाखाधिकारी बाबाजी लामखडे व राजेंद्र वराळ यांनी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रामाणिकपणे काम केल्याने या शाखेचा विकास मोठ्या प्रमाणात झाला असून वराळ यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करावे तेवढे थोडेच असल्याचे गौरवोद्गार शेळके ताई यांनी व्यक्त केले आहे. छायाताई शेळके यावेळी म्हणाल्या लॉकरची चौकशी करताना नकळत दागीणे खाली पडले हे लक्षातच आले नाही मात्र अतिशय प्रामाणिकपणे राजेश वराळ यांनी हे दागिने शाखाधिकारी लामखडे यांच्याकडे देत चेअरमन शेळके ताई यांच्या हस्ते सुपूर्द केले हाच प्रामाणिकपणा आम्हा ग्राहकांना आकर्षित करीत असून जी एस महानगर बँकेच्या कोनत्याही शाखेत गेले तरी तेथील सेवा व प्रामाणिकपणा ग्राहकांना आकर्षित करीत असल्याचे त्यांनी सांगत वराळ यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक केले.

## सौ. मिर्झा यांच्या प्रारब्ध कथासंग्रहाचे प्रकाशन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** माणसांच्या सामाजिक व्यवहाराचे सखोल चिंतन करून विधी लिखित घटना आणि घडामोडींचा परामर्श प्रारब्ध या कथासंग्रहाच्या माध्यमातून घेतलेला दिसून येतो, भविष्यकाळात निश्चितच या लेखिकेकडून अधिक कसदार साहित्य निर्मिती होऊ शकेल, असे मत न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी व्यक्त केले. शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनामध्ये शिक्षिका, लेखिका सौ. एस. एम. मिर्झा यांच्या प्रारब्ध या कथासंग्रहाचे प्रकाशन झाले. यावेळी विचारपीठावर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, माजी कुलगुरू डॉ. अशोकराव ढगे, संपादक प्रभाकर सूर्यवंशी, नवजीवन प्रतिष्ठानचे राजेंद्र पवार, शब्दगंध चे संस्थापक सुनील गोसावी व अध्यक्ष राजेंद्र उदागे उपस्थित होते.

सर्व प्रकारच्या सरकारमान्य पॅकिंग पिशव्या
रूखवत बॉक्सेस,
रिकामे मिठाई बॉक्सेस,
पेपर डिश,पत्रावळी, द्रोण,
पेपर नॅपकीन,
पिशव्या प्रिटींगसाठी.
मधुर प्लॅस्टीक
घासगल्ली, अहिल्यानगर

# मन मोकळं करायला आहे 'मनोसारथी' ;१०० हून अधिक ग्रामस्थांशी संवाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वेल्हे :** मानसिक ताण, चिंता आणि नैराश्य यांसारख्या समस्यांवर राजगडसारख्या ग्रामीण भागातही मोफत मदत मिळू शकते, हा विश्वास रेनट्री फाउंडेशनने निर्माण केला आहे. 'मनोसारथी' या समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून १०० हून अधिक ग्रामस्थांपर्यंत पोहोचत महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. यामुळे मानसिक आरोग्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हळूहळू बदलू लागला आहे.

२०२३ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाचा लाभ राजगड (वेल्हे) तालुक्यातील लव्ही, आवळी, मेरवणे, साखर, दादवडी, फणशी, चिरमोडी, घावर, गुंजवणे या नऊ गावांतील नागरिकांना होत आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्याच्या समस्या अनेकदा दुर्लक्षित राहतात. अशा व्यक्तींना वेळेवर समुपदेशन, मार्गदर्शन आणि भावनिक आधार देण्याचे काम मनोसारथी केंद्र करत आहे. मानसिक आरोग्याबाबतचे गैरसमज दूर करण्यासाठीही विविध जनजागृती उपक्रम राबविले जात आहेत.




समुपदेशन सेवा आता करंजावणे प्राथमिक आरोग्य केंद्र आणि साखर उपकेंद्राशी जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे गरजू नागरिकांना त्यांच्या परिसरातच मदत उपलब्ध होत आहे. तसेच आशासेविका आणि अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून, मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या लवकर ओळखणे आणि गरजूंना योग्य ठिकाणी मार्गदर्शन करणे अधिक प्रभावीपणे शक्य झाले आहे.

डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि स्थानिक समुदाय यांच्या सहकार्यामुळे समुपदेशनासाठी येणाऱ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे. १०० लाभार्थींपर्यंत पोहोचण्याचा टप्पा हा ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवांची वाढती गरज आणि मनोसारथीवरील वाढता विश्वास अधोरेखित करणारा ठरला आहे. पुढील काळात अधिकाधिक नागरिकांपर्यंत या सेवा पोहोचवण्याचा मानस रेनट्री फाउंडेशनने व्यक्त केला आहे.

> ''रेनट्री फाउंडेशनच्या मनोसारथी उपक्रमामुळे मानसिक आरोग्य सेवा लोकांच्या अधिक जवळ आल्या आहेत. गरजू व्यक्तींना वेळेवर मदत आणि मार्गदर्शन मिळणे हे या उपक्रमाचे महत्त्वाचे यश आहे.''
> – डॉ. शुभम लोहकरे,
> वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, करंजावणे

## द•ख•ल

## आळंदी इंद्रायणी घाटावर सुरक्षा रक्षकास मारहाण; कारवाईची मागणी

**आळंदी :** इंद्रायणी नदी घाट परिसरात मद्यप्राशन करून गोंधळ घालणाऱ्या एका मद्यपी नागरिकाने नगरपरिषदेच्या सुरक्षा रक्षकास शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना मंगळवारी (दि.२६ मे) रात्री घडली. याप्रकरणी संबंधितावर तात्काळ गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, अशी मागणी आळंदी नगरपरिषदेने दिघी पोलीस स्टेशनकडे केली आहे. नगरपरिषदेने दिलेल्या माहितीनुसार, इंद्रायणी नदी घाट परिसरात काही मद्यपी नागरिक रात्रीच्या वेळी मद्यप्राशन करून भाविकांना त्रास देत असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत होत्या. या पार्श्वभूमीवर भाविकांची सुरक्षा व घाट परिसरातील शांतता राखण्यासाठी नगरपरिषदेने रात्रीच्या वेळी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती केली आहे.

दरम्यान, राहूल रंगनाथ जगताप (रा. वाकडी, ता. लातूर, जि. लातूर) या व्यक्तीने घाट परिसरात मद्यप्राशन करून गोंधळ घातल्याचा आरोप आहे. कर्तव्यावर असलेल्या सुरक्षा रक्षकाने त्यास हटकले असता संबंधिताने अश्लील शिवीगाळ करत सुरक्षा रक्षकाच्या अंगावर धावून जात मारहाण केली. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याचे नगरपरिषदेच्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन करून गोंधळ घालणे तसेच कर्तव्य बजावणाऱ्या कर्मचाऱ्यावर हल्ला करणे हा गंभीर गुन्हा असल्याचे नगरपरिषदेने म्हटले आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (इछड) तसेच महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार संबंधितावर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी इंद्रायणी घाट परिसरात रात्रीच्या वेळी पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी केली आहे.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्साहात साजरी

**पुणे :**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी आणि स्वातंत्र्यलढ्यातील महत्वपूर्ण योगदान यांचा गौरवपूर्ण





उल्लेख करत स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या सरस्वती सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमास अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, प्रा. डॉ. सदानंद बनसोडे, प्रा.डॉ. रावसाहेब लटपटे, प्रा. डॉ. धनंजय मंडलिक आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच विद्यापीठातील विविध शैक्षणिक व प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेकायदेशीर 'टर्मिन' इंजेक्शन रॅकेटवर पोलिसांचा मोठा प्रहार..

**प्रतिनिधी : राष्ट्र सह्याद्री**



**बारामती :** शरीर क्षमता वाढविणे व बॉडी बिल्डिंगच्या नावाखाली तरुणांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बेकायदेशीर इंजेक्शन विक्री रॅकेटवर बारामती शहर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण यांनी संयुक्त कारवाई करत मोठा प्रहार केला आहे. या कारवाईत टर्मिन नावाने ओळखले जाणारे MEPHENTERMINE SULPHATE INJECTION IP ¶m Schedule-H प्रवर्गातील १०० सिलबंद इंजेक्शनसह एका आरोपीस अटक करण्यात आली असून ८३ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याप्रकरणी बारामती शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. २०३/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम १२३, १२५, २७८ तसेच औषध व सौंदर्य प्रसाधने अधिनियम १९४० चे कलम १८(उ), १८(अ)(VI), २7(¦), २८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २३ मे २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, पुणे ग्रामीण येथील पथकास गोपनीय माहिती मिळाली होती की, बारामती शहर हद्दीतील एम.ई.सी.बी. कार्यालयाजवळील सर्व्हिस रोड परिसरात एक इसम संशयास्पदरीत्या इंजेक्शनचा साठा घेऊन फिरत आहे. माहितीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तात्काळ सापळा रचून संबंधित ठिकाणी धाड टाकली. या वेळी रोडच्या कडेला अ‍ॅक्टीव्हा स्कुटी (MH42AW/9260) वर बसलेला एक इसम संशयास्पद अवस्थेत आढळून आला. त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव गौरव बाळासो जाधव (वय २४, रा. पवार बंगला जवळ, आमराई, बारामती) असे सांगितले. पोलिसांनी त्याची व त्याच्या स्कुटीची झडती घेतली असता डिकीत ठेवलेल्या खाकी बॉक्समध्ये टर्मिन नावाने ओळखले जाणारे MEPHENTERMINE SULPHATE INJECTION IP चे १०० सिलबंद इंजेक्शन आढळून आले.

## डिंभे धरणातून उजव्या कालव्याला पाणी शेतकऱ्यांनी व्यक्त केले समाधान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी,:** आंबेगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार डिंभे धरणातून उजव्या कालव्याला उन्हाळी आवर्तनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही मार्गी लागणार आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता वाढल्याने पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली होती.

> **उन्हाळी आवर्तन पाणी सोडण्याबाबत शेतकऱ्यांनी मागणी केली होती जलसंपदा विभागाने शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेता व उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली होती पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला होता परंतु उजव्या कालव्याला पाणी आल्यामुळे पिण्याच्या पाण्याबरोबर जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.**
> **सचिन टाव्हरे**
> **उपसरपंच ग्रामपंचायत जारकरवाडी.**

शेतकऱ्यांकडून उजव्या कालव्याला तातडीने पाणी सोडण्याची मागणी करण्यात येत होती. अखेर जलसंपदा विभागाने सकारात्मक निर्णय घेत उजव्या कालव्याला पाणी सोडले आहे.

या पाण्यामुळे शेतीला दिलासा मिळणार असून जनावरांसाठी हिरव्या चाऱ्याची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच अनेक गावांतील पिण्याच्या पाण्याची समस्या देखील कमी होण्यास मदत होणार असल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, उन्हाळ्यात नियमित पाणीपुरवठा सुरू ठेवावा, अशी मागणी देखील शेतकऱ्यानी व्यक्त केली आहे



## डिएपी खतास पर्यायी खते वापरण्याचे आवाहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** शेतकऱ्यांनी चालू खरीप हंगामामध्ये केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात येत येत आहे.

राज्यामध्ये मागील ३ वर्षात खरीप हंगामात ४४ लाख मे.टन रासायनिक खतांचा वापर झाला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने युरिया, डीएपी, एमओपी (म्युरेट ऑफ पोटॅश) संयुक्त खते व एसएसपी (सिंगल सुपर फॉस्फेट) या खतांचा वापर केला जातो. महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचेआधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीताअग्रेसर आहे. राज्यामध्ये लवकरच पेरणीला सुरुवात होणार असून डिएपी खताची शेतक-यांकडून जास्त मागणी होणार आहे. डिएपी खता मध्ये १८ टक्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ टक्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात. सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे . डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच एनपीके-१०:२६:२६, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६, युरिया एसएसपी कॉम्पलेक्स व एनपीके-१५:१५:१५ या संयुक्त खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो. त्याचबरोबर टिएसपी या खतामध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याची मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचाळे यांनी दिली आहे.

## पोलीस ठाण्यात धूळ खात पडलेल्या वाहनांना अखेर 'घरचा रस्ता'..!

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** पोलीस ठाण्याच्या आवारात वर्षानुवर्षे धूळ खात पडून असलेल्या मुद्देमालातील तसेच बेवारस वाहनांना अखेर न्याय मिळाला आहे. बारामती ग्रामीण पोलीस स्टेशनने राबविलेल्या विशेष मोहिमेत तब्बल १३ वाहनांचा शोध घेऊन ती मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आली. पोलिसांच्या या पुढाकारामुळे अनेक वाहनमालकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले असून पोलिसांप्रती विश्वासही निर्माण झाला आहे.

पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात आली. अनेक वर्षांपासून पोलीस ठाण्याच्या परिसरात पडून असलेल्या वाहनांची इंजिन व चेसिस क्रमांकाच्या आधारे पडताळणी करण्यात आली. काही वाहनांचे नंबर अस्पष्ट झाले होते, तर काही वाहनांची अवस्था अतिशय खराब झाली होती. तरीही पोलिसांनी आरटीओ नोंदी, जुने गुन्हे रेकॉर्ड आणि कागदपत्रांचा आधार घेत संबंधित मालकांचा शोध घेतला. वाहनांची ओळख पटविल्यानंतर संबंधित मालकांना संपर्क करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आणि त्यानंतर ही वाहने मालकांच्या स्वाधीन करण्यात आली.

> **बारामती ग्रामीण पोलिस ठाण्याचा स्तुत्य उपक्रम; ५ लाखांची १३ बेवारस वाहने मूळ मालकांच्या ताब्यात, आणखी ५0 वाहनांसाठी शोधमोहीम वेगात**

अनेक वाहनमालकांनी वर्षानुवर्षे आपली वाहने मिळण्याची आशाच सोडली होती. मात्र पोलिसांच्या या मोहिमेमुळे त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. पोलीस ठाण्यांच्या आवारात मोठ्या प्रमाणावर बेवारस वाहने पडून राहत असल्याने जागेची कमतरता निर्माण होते. शिवाय अनेक वाहने पावसात-उन्हात खराब होत जातात. त्यामुळे अशा वाहनांची योग्य तपासणी करून ती मूळ मालकांना परत देण्याचा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या सर्व वाहनांची अंदाजे किंमत सुमारे ५ लाख २० हजार रुपये इतकी असून, येत्या काही दिवसांत आणखी ५० बेवारस वाहनांचा शोध घेऊन तीही मूळ मालकांच्या ताब्यात देण्यासाठी प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली.

ही आहेत वाहने आणि त्याचे मालक

बाळासाहेब आल्हाट, रा. माळेगाव बुद्रुक ता. बारामती MH-42 X-1912, किशोर दळवी, रा. दहिगाव ता. माळशिरस MH-45 Z-2285, विशाल निंबाळकर, रा. फरतडवाडी ता. फलटण MH-11 BF-8469, शरद भगवान गरुड, रा. वाल्हे ता. पुरंदर MH-12 GJ-2373, किरण सतीश जराड, रा. माळेगाव बुद्रुक शिवनगर ता. बारामती MH-42 AK-3270, रामदास धोंडीबा चव्हाण, रा. काळेवाडी ता. दौंड MH-42 R-2079, कुंडलिक जयसिंग घोरपडे, रा. कोळवीहरे ता. पुरंदर MH-12 GY-2034, अमर आजिनाथ भोसले,



रा. झारगडवाडी ता. बारामती MH-42 AL-5526, सुनील दत्तात्रय कोकणे, रा. झारगडवाडी ता. बारामती MH-42 AL-4162, सदाशिव विश्वनाथ कोठाळे, रा. गोखळी ता. फलटण MH-11 CR-3374, अण्णा उत्तम चव्हाण, रा. कोपर्डी हवेली ता. कराड MH-50 E-7379, राजेंद्र वसंत आटोळे, रा. गोखळी ता. फलटण MH-42 AC-3771, नंदकुमार कोंडीबा लोंढे, रा. देऊळगाव रसाळ ता. बारामती MH-42 U-6205

पोलिसांच्या या कामकाजाबद्दल नागरिकांत समाधान व्यक्त होत असून, 'पोलीस केवळ गुन्हे उघड करत नाहीत, तर नागरिकांच्या मालमत्तेची जबाबदारीही जपतात,' अशी प्रतिक्रिया वाहन मालकांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव तसेच कल्याण शिंगाडे,भारती खंडागळे, नितीन ढवन ,निलेश वाकळे यांनी केली.

## आंतरराष्ट्रीय मासिक पाळी दिनानिमित्त आळंदीत रजोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आंतरराष्ट्रीय मासिक पाळी दिनानिमित्त आळंदी नगरपरिषद, क्षितिज बहुउद्देशीय संस्था तसेच युनिसेफ, वॉश युनायटेड आणि वॉश इयर्स कोऑलिशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रजोत्सव उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. महिला आरोग्य, मासिक पाळीबाबत जनजागृती आणि समाजात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात मासिक पाळी विषयातील पुरुषांचे योगदान या संकल्पनेला विशेष महत्त्व देण्यात आले. यावेळी मासिक पाळी जनजागृती प्रतिज्ञापत्राचे विमोचन करण्यात आले तसेच उपस्थितांनी मासिक पाळी स्वच्छता प्रतिज्ञा घेऊन समाजात जागरूकतेचा संदेश दिला.

क्षितिज संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा स्नेहल चौधरी यांनी मासिक पाळीदरम्यान महिलांनी घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी, पोषण आहार, पुरुषांचा सहभाग तसेच रजोनिवृत्ती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मासिक पाळीबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करून संवेदनशील आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी महिलांसाठी व किशोरवयीन मुलींसाठी आनंदी रूम सारखी सुविधा आळंदीमध्ये उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे सांगितले. महिलांच्या आरोग्यविषयक उपक्रमांना नगरपरिषदेचे सहकार्य कायम राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, महिला व बालकल्याण सभापती ऋतुजा तापकीर, नगरसेविका साक्षी कुऱ्हाडे, पूजा घुंडरे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली वैशाली पाटील, क्षितिज सामाजिक संस्थेच्या स्नेहल चौधरी, युनिसेफचे आनंद घोडके, संदीप तेंडुलकर यांच्या सहकार्याने अंकिता गुडजी, अतुल राऊत, राजलक्ष्मी पाटील, निसर्गा मेश्राम, अमृता आणि निशांत यांनी




कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. महिलांच्या आरोग्य, स्वच्छता आणि सन्मानाबाबत समाजामध्ये जागरूकता निर्माण करणारा हा उपक्रम उपस्थितांकडून कौतुकास पात्र ठरला. मासिक पाळी ही लाज नसून नैसर्गिक प्रक्रिया आहे आणि त्याविषयी खुलेपणाने संवाद होणे आवश्यक असल्याचा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

## थकीत मानधनासाठी राज्यव्यापी काम बंद आंदोलनाचा इशारा

### पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचा शासनाला इशारा ; १ जूनपासून आंदोलन छेडणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** महाराष्ट्र राज्य गट संसाधन केंद्र (पाणी व स्वच्छता) कंत्राटी कर्मचारी संघटनेच्या वतीने पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या गट संसाधन केंद्रातील (इठउ) कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मानधनाच्या प्रश्नावर राज्य सरकारला निवेदन देण्यात आले असून, मागण्या मान्य न झाल्यास राज्यव्यापी काम बंद आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

सदर निवेदन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांना देण्यात आले असून, राज्यातील पंचायत समिती अंतर्गत पाणी व स्वच्छता विभागात कार्यरत गट समन्वयक व समूह समन्वयक कर्मचारी अनेक वर्षांपासून प्रामाणिकपणे सेवा बजावत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना, स्वच्छ भारत अभियान तसेच जल जीवन मिशन यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी हे कर्मचारी सातत्याने कार्यरत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले. मात्र मागील डिसेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधीतील तब्बल पाच महिन्यांचे मानधन अद्याप मिळाले नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. मे महिनाही संपत आला असून एकूण सहा महिन्यांपासून मानधन मिळाले नसल्याने कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. घरखर्च, मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले असल्याची व्यथा कर्मचाऱ्यांनी निवेदनातून मांडली आहे.

यापूर्वीही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार तोंडी व लेखी पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने मिळाली, मात्र प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये प्रलंबित संपूर्ण मानधन तात्काळ कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा करणे, तसेच मानधनाचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढणे यांचा समावेश आहे. ३० मे २०२६ पर्यंत प्रश्न सुटला नाही तर १ जूनपासून राज्यभरातील गट संसाधन केंद्रातील कर्मचारी पूर्ण वेळ काम बंद आंदोलनात सहभागी होणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात १ जून ते ५ जूनदरम्यान जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात ८ जून रोजी राज्यस्तरीय कंत्राटी कर्मचारी जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव ते मंत्री गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानापर्यंत पायी यात्रा काढून धरणे आंदोलन करणार आहेत. तिसऱ्या टप्प्यात मागण्या मान्य होईपर्यंत राज्यव्यापी काम बंद आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे. या आंदोलनामुळे पाणी व स्वच्छता विभागाचे विविध कामकाज ठप्प होण्याची शक्यता असून, त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन आणि प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदर निवेदनावर राज्य सचिव जयंत वर्मा आणि राज्याध्यक्ष विलास निकम यांच्या स्वाक्षऱ्या असून, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, प्रधान सचिव, अभियान संचालक, जिल्हाधिकारी तसेच संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना निवेदनाच्या प्रती पाठविण्यात आल्या आहेत.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ४० उमेदवारांवर अपात्रतेची कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** पुणे विभागातील नगरपरिषद, नगरपंचायती व महानगरपालिका निवडणुकांमधील पुणे महानगरपालिकेच्या २२, पंढरपूर नगरपरिषदेच्या १५ व अक्कलकोट नगरपरिषदेच्या ३ अशा एकूण ४० उमेदवारांवर २६ मे २०२६ पासून पुढील ३ वर्षासाठी अपात्र केल्याचे आदेश विभागीय आयुक्त शीतल तेली- उगले यांनी जारी केले आहेत. अपात्र घोषित करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय तसेच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पुणे विभागातील एकूण ६० नगरपरिषदा, नगरपंचायतींची सार्वत्रिक निवडणूक २ डिसेंबर २०२५ व ६ महानगरपालिकांची सार्वत्रिक निवडणूक १४ जानेवारी २०२६ रोजी पार पडली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये निवडणूक लढविलेल्या पुणे महानगरपालिकेच्या २२, पंढरपूर नगरपरिषदेच्या १५ व अक्कलकोट नगरपरिषदेच्या ३ उमेदवारांनी अनुक्रमे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० (१ई) तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ कलम १६ (१ड) मधील तरतुदीनुसार विहित मुदतीत (३० दिवस) निवडणूक खर्चाचा हिशोब सादर केला नाही.

पुणे महानगरपालिका आयुक्त तसेच सोलापूर जिल्हाधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे ५ व २५ मे २०२६ रोजी याबाबत संबंधिताना आपले म्हणणे दाखल करण्याबद्दल सुनावणी आयोजित करण्यात आली. सदर सुनावणीदरम्यान संबंधित उमेदवारांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार संबंधित उमेदवारांना निवडणूक खर्च सादर करण्यात कसूर केल्याबद्दल आदेशाच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीसाठी निवडणूक लढविण्यास अपात्र घोषित करण्यात आले असल्याची माहिती नगर परिषद प्रशासनाच्या उप आयुक्त प्रतिभा पाटील यांनी कळविली आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## हिंगणी-दुमाला परिसरात अवैध माती उत्खननावर महसूलची कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : तालुक्यातील हिंगणी-दुमाला व निंबवी परिसरात सुरू असलेल्या अवैध माती उत्खननाविरोधात महसूल प्रशासनाने बुधवारी मोठी कारवाई केली. तहसीलदार सचिन डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने छापा टाकत दोन हायवा वाहनांसह सुमारे ४० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार महसूल विभागाचे पथक हिंगणी-दुमाला परिसरात पोहोचले असता दोन हायवा वाहनांमधून नदीपात्रातील पोयटा मातीची अवैध वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. वाहन चालकांकडे उत्खनन अथवा वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे तपासात स्पष्ट झाले.कारवाईदरम्यान एका वाहनाचा क्रमांक चक-१६-उझ-८०९९ असल्याचे समोर आले, तर दुसरे वाहन विनानंबर होते. महसूल अधिकाऱ्यांनी पंचनामा करून प्रत्येकी पाच ब्रास मातीसह दोन हायवा वाहनांचा मुद्देमाल जप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली.दरम्यान, कारवाईवेळी काही चालकांनी महसूल पथकाशी उद्धट वर्तन करत सरकारी कामात अडथळा आणल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. काही आरोपी वाहन सोडून घटनास्थळावरून पसार झाल्याची माहितीही समोर आली आहे.या प्रकरणी बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अवैध उत्खनन करणाऱ्यांवर महसूल व पोलीस प्रशासनाने संयुक्त कारवाईचा बडगा उगारला आहे. माती माफियांना आता महसूलचा 'रेड सिग्नल' लागलाय, अशी चर्चा तालुक्यात रंगली आहे.

## किरकोळ कारणावरून महिलेला शिवीगाळ व मारहाण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : दुकानाला आडवे बांधलेले कापड खराब झालेले आहे, ते बदलुन टाका, असे म्हणून आरोपींनी एका ५० वर्षीय महिलेला शिवीगाळ करुन ऊसाच्या टिपराने मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील शनी शिंगणापूर फाटा येथे दि. २८ मे रोजी घडली. मंदा नामदेव सांगळे, वय ५० वर्षे, ह्या राहुरी तालुक्यातील गोटुंबे आखाडा येथे राहत असून त्यांचे शनी शिंगणापूर फाटा येथे रसवंतीचे दुकान आहे. त्यांच्या शेजारीच आरोपींचे रसवंतीचे दुकान आहे. दि. २८ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मंदा सांगळे ह्या त्यांच्या रसवंतीचे दुकानात रस विक्री करीत होत्या. तेव्हा आरोपी त्यांना म्हणाले कि, तुम्ही दुकानाला आडवे बांधलेले कापड खराब झालेले आहे, ते बदलुन टाका. तेव्हा मंदा सांगळे त्यांना समजावुन सांगत असताना आरोपींना राग आल्याने त्यांनी मंदा सांगळे यांना शिवीगाळ करून ऊसाच्या टिपराने मारहाण केली. तसेच तु परत आमचे नादी लागली तर तुला जिवे मारून टाकू, अशी धमकी दिली. घटने नंतर मंदा नामदेव सांगळे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी आण्णा हरिच्छंद्रे, नंदु आण्णा हरिच्छंद्रे, भाऊराव आण्णा हरिच्छंद्रे, सर्व रा. गोटुंबे आखाडा, ता. राहुरी, या तिघां विरूध्द गुन्हा रजि. नं. ६१५/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), ३५१ (२), ३५२, ३ (५) प्रमाणे शिवीगाळ, मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# विखेंच्या बालेकिल्ल्यात विवेक कोल्हेंचा 'करंट'

## घायल नही घातक हूं... म्हणत ललकारी





अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : घायल होता हू तो घातक होता हू म्हणत विखें च्या बाले किल्ल्यात येवून विधान परिषदेचे नवनिर्वाचित सदस्य आमदार विवेक कोल्हे यांनी विखेंना पुन्हा ललकारल्याने काल राहात्यात पुन्हा विखे विरुद्ध कोल्हे असा संघर्ष पहावयास मिळाला . निमित्त होते आमदार विवेक कोल्हे यांच्या गणेश परिसराच्या वतीने आयोजित सत्कार समारंभाचे. काल राहाता तालुक्यातील गणेश परीसरातील कार्यकर्त्यांनी नुकतेच विधान परिषदेवर बिन विरोध निवडून आलेले विवेक कोल्हे यांचा भव्य नागरी सत्काराचे आयोजन राहात्यातील विरभद्र मंदीराच्या प्रांगणात करण्यात आले होते . या सभेस विखे विरोधातील सर्वच कार्यकर्त्यांनी तुडूंब गर्दी केली होती.

कार्यक्रमास प्रामुख्याने ना विखे यांच्या विरोधात विधानसभा लढणाऱ्या सौ . प्रभावती घोगरे, डॉ . राजेंद्र पिपाडा, सुहास वहाडणे, डॉ एकनाथ गोंदकर, निळवंडे पाट पाणी कृती समितीचे कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्वानीच विखेंचे नाव न घेता बोलण्याची संधी सोडली नाही. यावेळी सत्काराला उत्तर देताना आ कोल्हे म्हणाले की, मी जेव्हा राहात्यात येतो तेव्हा येथे करंट लागतो .आमदार झाल्यानंतर माझे खुप ठिकाणी मोठमोठे सत्कार झाले परंतु राहाता येथे माझा जो सत्कार ठेवला आहे तो माझ्या साठी विषेश आहे कारण ज्या विरभद्र मंदिरासमोर एकेकाळी माझी सभा नाकारली त्याच मंदिरासमोर आजची गर्दी व सत्कार सोहळा हा राज्यभर झालेल्या सत्कारापेक्षा मोठा व तेवढीच जबाबदारी वाढवणारा आहे.

तसेच आम्ही गणेश कारखाना ताब्यात घेत तो व्यवस्थित चालवत आहोत परंतु येथील नेत्यांनी गणेश ला जिल्हा सहकारी बँकेचे ४० कोटी रुपये मिळू नये म्हणून सुप्रीम कोर्टा पर्यत दावा दाखल करत आडवणून करण्याचं काम याठीकाणी होत आहे. आडकाठी आणणाऱ्यांना माझी विनंती आहे. संयमाला मर्यादा असते . नाही ऐकले तर माझा स्वभाव कसा आहे अशा प्रवृत्ती विरुद्ध आवाज उठवण्याचं काम मी करेल . जेव्हा मी घायाळ असतो तेव्हा मी घातक बनायला मागे पुढे पाहणार नाही.

राहाता परिसरातील जनतेसाठी खंबीर पणे उभा राहणार असल्याचे त्यांनी ठणवल्याने पुढील काळात विखे कोल्हे संघर्षाची धार आणखी वाढण्याची चिन्हे निर्माण झाली असून कोल्हे च्या या भाषणां मुळं विखे विरोधकामधे पुन्हा एकदा ताकत निर्माण झाली आहे .

### माझं कार्य क्षेत्र राहाता व लोणी

आपण सत्ताधारी होतो पण सत्तेत नवतो आता मुख्यमंत्र्यांनी माझ्या छातीवर बिल्ला लावला आहे . आपली हॉट लाईन गल्ली ते दिल्ली आहे. माझ्या आमदार रुपी सात बाऱ्याचे कार्यक्षेत्र २८८ मतदार संघ आहे त्या मधे राहाता व लोणी येते याची मला कल्पना आहे या सारख्या वक्तव्यामुळे विखेंना ललकारल्याचे दिसून येत आहे .

### अशा भाषणांना मी महत्त्व देत नाही : ना. विखे

राज्याचे मुख्यमंत्री ना . देवेंद्र फडणवीस यांनी जिल्ह्यातील पक्षाची ताकद वाढवण्यासाठी पक्षाची घडी अगदी व्यवस्थित बसवली आहे पक्षाची क्षमता वाढवण्यासाठी अनेकांना संधी दिली जात आहे . जिल्ह्यात राम शिंदे, सत्यजीत तांबे तसेच आता होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकीत पुन्हा पक्ष वाढीसाठी संधी मिळणार आहे .पक्ष मजबूत झाला पाहिजे हीच त्या मागची भूमिका आहे .स्टेजवर कोण कोण काय काय भाषणे करते याला मी महत्त्व देत नाही माझ्या मताप्रमाणे त्याला महत्त्वही नाही. मी या वक्तव्याला जास्त मनावर घेत नाही यापूर्वीही जिल्हा विखेंच्या विरोधात होता त्यामुळे मी अशा वक्तव्याला जास्त महत्त्व देत नाही .तसेच आ . विवेक कोल्हे यांनी गणेश कारखान्याचे चाळीस कोटी रुपये कारखान्याला मिळू नये म्हणून आडकाठी आणण्याचा आरोप केल्याबद्दल ना. विखे म्हणाले की, सहकाराची वेगळी भूमिका असते त्याचा राजकारणाचा कुठलाही संबंध नसतो तो विषय वेगळा आहे असे म्हणत त्यांनी त्या विषयाला बगल दिली. माझे कुणाशी मतभेद नव्हते आणि नाही असे ही ना. विखे म्हणाले

# महानगरपालिकेत नोकरीस लावून देतो

## फसवणूक करणारा फरार आरोपी गजाआड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : अहिल्यानगर महानगरपालिकेत नोकरीस लावून देतो, असे म्हणून तसा, फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांना बनावट नियुक्तीपत्र देवून त्यांचेकडून रोख रक्कम व ऑनलाईन स्वरुपात एकूण १०,००,०००/- रु. इतकी फसवणूक केल्याची घटना घडली. याप्रकरणी, सोनई पोलिस ठाण्यात गु.र.नं. ४२९/२०२५ बी.एन.एस कलम ३१८ (२) (४), ३४० (२) प्रमाणे ( दि.१८ ) नोव्हेंबर २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.सदरच्या गुन्हयात तपासात गुन्हयातील आरोपीचा सोनई पोलीसाकडून शोध घेण्यात आला. परंतू आरोपी अद्याप ही मिळून आला नव्हता.मात्र शोधण्यात अखेर यश मिळाले असून,यातील,आरोपी अतुल अनिल दोडके, (रा.निपाणी वडगाव ता.श्रीरामपूर) अनिकेत गायकवाड (पूर्ण नाव माहित नाही) (रा.उस्तळ दुमाला,ता.नेवासा) यांनी महानगरपालिकेत नोकरीला लावून देतो असे, म्हणून विश्वास संपादन करून त्यांना बनावट नियुक्तीपत्र देवून त्यांचेकडून रोख व ऑनलाईन स्वरुपात एकूण १०,००,०००/- रु. इतकी फसवणूक केली.याबाबत (दि.२७ ) मे रोजी श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना मिळालेल्या गुप्त बातमीदाराकडून गोपनीय माहिती समजले या गुन्ह्यातील फरार आरोपी अतुल अनिल दोडके हा अशोकनगर येथे लपून बसला आहे. त्याकामी श्रीरामपूर नेमणुकीचे पो.हे.कॉ.दादासाहेब लोंढे,पो.ना.संदिप दरंदले, पो.कॉ.राजेंद्र बिरदवडे, पो.कॉ.सहदेव चव्हाण, पो.कॉ.अशोक गाढे यांनी पथकास आदेश दिल्यानंतर आरोपीचा शोधकामी ताब्यात घेण्याच्या सुचना दिल्या.त्यानंतर पथकाने अशोकनगर येथे जावून आरोपीचा मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे शोध घेतला. तेथे खात्रीशीर बातमी मिळाल्यानंतर त्यास सापळा रचून कौशल्यपुर्णरित्या ताब्यात घेण्यात आले.या आरोपीची चौकशी केली असता,आपले नाव अतुल अनिल दोडके, (रा.निपाणीवडगाव ) असे सागितले.सदरच्या गुन्ह्याची सखोल चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुली दिली.अधिक तपास पो.स.ई. सुरज मेढे हे करित आहे.आरोपीस न्यायालयाने २ दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली.या कारवाईत पोलीस अधिक्षक मुम्मका एम सुदर्शन,श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली सोनई पोलीस करित आहेत.

### पोलिसांचे आवाहन

आरोपी किंवा इतर कोणत्याही इसमाने ज्या कोणास नोकरीला लावून देतो,असे काही भुलथापा देवून खोटे आश्वासन दिले जात असेल तसेच त्याच बदल्यात पैसे घेवून फसवणूकीच्या घटना समोर आल्या आहेत. याबाबत नागरिकांनी जागृत रहावे, काही घडल्यास पोलिसांना संपर्क करावा, अशा भुलथापांना कोणी बळी पडू नये,असे पोलिसांमार्फत आवाहन करण्यात आले.

# मराठा आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक

## जरांगे पाटलांची भेट घेणार : ना. विखे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : मराठा आरक्षणाच्या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री यांच्यावर टीका करणे योग्य नसून, सरकारकडून समाजाच्या मागण्यांबाबत सकारात्मक कार्यवाही सुरू असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री यांनी केले. तसेच २९ मे रोजी यांची भेट घेऊन सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती देत उपोषण स्थगित करण्याची विनंती करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माध्यमांशी संवाद साधताना ना. विखे पाटील म्हणाले की, मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका सुरुवातीपासून सकारात्मक राहिली आहे. २०१४ ते २०१९ या कालावधीत मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला दिलेले आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकले होते.

मात्र, त्यानंतर महाविकास आघाडी सरकारला ते आरक्षण टिकवता आले नाही, अशी टीकाही त्यांनी केली. महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर मराठा आरक्षणासाठी पुन्हा प्रयत्न सुरू करण्यात आले असून, जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार सरकारने हैदराबाद गॅझेटही जाहीर केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आरक्षणाचा प्रश्न कायद्याच्या चौकटीत राहून सोडवावा लागणार असल्याने सरकार अत्यंत काळजीपूर्वक कार्यवाही करत असल्याचे त्यांनी सांगितले. उपोषण हा एकमेव मार्ग नाही. जरांगे पाटील यांच्या बहुतांश मागण्या सरकारने मान्य केल्या असून उर्वरित मागण्यांवरही कार्यवाही सुरू आहे. समाजासाठी त्यांनी उभारलेला लढा आदरयुक्त आहे, असे विखे पाटील म्हणाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर करण्यात आलेले आरोप गैरसमजातून झाल्याचे सांगत, मराठा समाजाला आरक्षण देण्याचे आणि ते सर्वोच्च न्यायालयात टिकवण्याचे श्रेय फडणवीस यांनाच जाते, असे त्यांनी नमूद केले. सरकार म्हणून आम्ही एकत्रितपणे कार्य करत आहोत. केवळ एका व्यक्तीवर टीका करून प्रश्न सुटणार नाही, असेही ते म्हणाले. दरम्यान, २९ मे रोजी मनोज जरांगे पाटील यांची प्रत्यक्ष भेट घेऊन गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ना. विखे पाटील यांनी सांगितले.

# जामखेडमध्ये कत्तलीसाठी डांबलेले ८ गोवंश पोलिसांनी सोडवले

## गोशाळेत सुखरूप रवानगी, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचा पाठपुरावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड** : बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जामखेड शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या कुरेशी मोहल्ला येथे कत्तलीसाठी ८ गोवंश विनापाणी व चाऱ्याशिवाय डांबून ठेवल्याची घटना उघडकीस आली. मानद पशु कल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी व श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष पांडुराजे मधुकर भोसले यांना याबाबत माहिती मिळताच त्यांनी तात्काळ जामखेड पोलिस निरीक्षकांशी संपर्क साधला.

पोलिसांनी तत्पर कारवाई करत संबंधित ठिकाणी छापा टाकून सर्व ८ गोवंश ताब्यात घेतले. याप्रकरणी जामखेड पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, सोडवण्यात आलेले सर्व गोवंश मुळेवाडी येथील रुक्मिणी गोशाळेत सुखरूप सोडण्यात आले आहेत.

### नगरपरिषदेच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह

यावेळी बोलताना श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष पांडुराजे भोसले म्हणाले, जामखेड शहरातील बेकायदेशीर कत्तलखान्यांबाबत आम्ही जामखेड नगरपरिषदेला वेळोवेळी निवेदन दिले आहेत. मात्र नगरपरिषदेने अद्यापही हे कत्तलखाने बंद केलेले नाहीत. भर चौकात उघडपणे बीफ खानावळ सुरू असून प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही.

### लोकप्रतिनिधींनाही दिले निवेदन

शहरातील कत्तलखाने व मोठ्या प्रमाणावर होणारी गोतस्करी थांबवावी यासाठी आमदार रोहित पवार व सभापती राम शिंदे यांनाही निवेदने देण्यात आली आहेत. तरीही अपेक्षित कारवाई होत नसल्याची खंत पांडुराजे भोसले यांनी व्यक्त केली.

### आंदोलनाचा इशारा

जर प्रशासनाने बेकायदेशीर कत्तलखान्यांवर तातडीने कारवाई करून ते बंद केले नाहीत, तर श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी पांडुराजे भोसले यांनी दिला. जामखेड पोलिसांची कारवाई अपुरी पडत असल्याचा आरोपही त्यांनी केला.



# माणसं जोडणारे नेते - शंकरराव गडाख पाटील



२९ मे २०२६ रोजी माजी मंत्री मा. शंकररावजी गडाख पाटील हे आपल्या आयुष्याची ५६ वर्षे पूर्ण करून ५७ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रातील कार्याचा घेतलेला हा संक्षिप्त आढावा....

शंकरराव गडाख पाटील यांनी १९९४ पासून सक्रिय राजकारणात प्रवेश केला. त्यापूर्वी युवक संघटनांच्या माध्यमातून युवकांचे प्रश्न सोडवताना त्यांनी मजबूत जनसंपर्क निर्माण केला. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते सोनई येथे स्थायिक झाले. गावातील चहाच्या टपरीवर बसून लोकांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या समस्या वरिष्ठांपर्यंत पोहोचवून सोडवणे, यातून त्यांच्याबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला.

१९९४ मध्ये मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत ते संचालक म्हणून निवडून आले. पुढे चेअरमन पदाची जबाबदारी सांभाळताना त्यांनी कारखान्यात अनेक नाविन्यपूर्ण निर्णय घेतले. सुधारित ऊस जाती, आधुनिक शेती पद्धती, रासायनिक खते व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. आर्थिक शिस्त आणि सक्षम व्यवस्थापनामुळे कारखान्याला उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापनाचे पुरस्कारही मिळाले.

साखर उद्योगाबरोबरच त्यांनी सहवीज निर्मिती प्रकल्प उभारून उद्योग क्षेत्रात महत्त्वपूर्ण काम केले. ३० मेगावॅट क्षमतेचा प्रकल्प यशस्वीपणे सुरू करण्यात आला. तसेच मुळा सहकारी बँक, मुळा बाजार आणि दूध संघ अशा विविध संस्थांच्या स्थापनेत त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

२००७ मध्ये अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी चेअरमन पदही यशस्वीपणे सांभाळले. महिला बचत गट, शेतकरी आणि विद्यार्थ्यांना कमी व्याजदरात कर्ज मिळावे यासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

२००९ मध्ये नेवासा मतदारसंघातून ते प्रथमच विधानसभेवर निवडून गेले. आमदार म्हणून त्यांनी रस्ते, वीज आणि पाणी या मूलभूत सुविधांवर भर दिला. तालुक्यात शेकडो बंधारे उभारून जलसंधारणाचे महत्त्वपूर्ण काम केले. त्यामुळे भूजल पातळी वाढून शेतीला शाश्वत पाणी उपलब्ध झाले. घोडेगाव येथे आधुनिक कांदा मार्केट सुरू करून शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली. २००३ च्या दुष्काळात जनावरांसाठी छावण्या सुरू करून त्यांनी संवेदनशील नेतृत्वाचे दर्शन घडवले. शिक्षण क्षेत्रातही मुळा एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या.

२०१४ च्या पराभवानंतरही त्यांनी खचून न जाता संघटना अधिक मजबूत केली. २०१९ मध्ये ते पुन्हा मोठ्या मताधिक्याने विजयी झाले आणि त्यांना मंत्रिपदाची संधी मिळाली. मृद व जलसंधारण मंत्री म्हणून त्यांनी नेवासा तालुक्यासाठी मोठ्या प्रमाणात विकास निधी आणला. कोरोना काळातही त्यांनी जनसंपर्क आणि विकासकामे सुरू ठेवली.

आजही शंकरराव गडाख पाटील हे माणसं जोडणारे नेते म्हणून ओळखले जातात. गावागावातील निवडणुका बिनविरोध व्हाव्यात, गावात एकोपा टिकावा आणि विकासाला चालना मिळावी, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अल्प मतांनी पराभव झाल्यानंतरही त्यांनी मोठ्या मनाने निकाल स्वीकारून पुन्हा नव्या जोमाने काम सुरू ठेवले आहे. मुळा सहकारी साखर कारखाना, मुळा एज्युकेशन सोसायटी, मुळा बँक आणि इतर अनेक संस्था आजही त्यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे कार्यरत आहेत.

जनतेच्या सुख-दुःखात सदैव सहभागी राहणाऱ्या या लोकाभिमुख नेत्याला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि जनसेवेचे बळ लाभो, हीच वाढदिवसानिमित्त जनतेची सदिच्छा.

संकलन : भूषण व गणेश खंडागळे, सोनई / शनिशिंगणापूर
शब्दांकन : शंकरराव दरंदले, सोनई

स्व.ऋषिकेश किशोर (गणेश)छल्लारे यांस प्रथम पुण्यस्मरण निमित्त भावपूर्ण श्रद्धांजली...




निरज भैय्या सिद्धार्थ मुरकुटे
युवा नेते, संचालक - अशोक सह.सा.कारखाना,अशोकनगर

श्री.युवराज बाळासाहेब पा.थोरात
युवा नेते, उक्कलगांव, ता.श्रीरामपूर

श्री.आशिष सुरेश दौंड
विद्यमान सदस्य ग्रा.पं. व मा.सरपंच निपाणी वाडगाव, ता.श्रीरामपूर

श्री.सचिन राऊत
उपसरपंच ग्रा.पं.वांगी खुर्द, ता.श्रीरामपूर

श्री.दिपक मोहनराव काळे पा.
सरपंच खोकर ग्रा.पं., ता.श्रीरामपूर

श्री.पुंजाहरी तुकाराम पा.शिंदे
मा.व्हा.चेअरमन अशोक कारखाना, अशोकनगर, ता.श्रीरामपूर

श्री.ओम साई अर्थ मुव्हर्स
प्रो.प्रा.अजित बोडखे, टाकळीभान

श्री.सागर सुरेश पा.शिंदे
मा.चेअरमन भोकर सोसा., ता.श्रीरामपूर

श्री.अमोल चांगदेव कलांगडे
संतकृपा उद्योग समुह निमगांव खैरी, ता.श्रीरामपूर

श्री.निलेश मच्छिंद्र विधाटे
चेअरमन भोकर, विविध कार्यकारी सेवा संस्था., ता.श्रीरामपूर

श्री.ऋषिकेश बाळासाहेब झिने
श्रीरामपूर ता.उपाध्यक्ष समता परिषद व
अध्यक्ष शाळा व्यवस्थपान समिती जि.प.शाळा, भोकर

श्री.बाळासाहेब सुभाष मोरे
माळवाडगाव, ता.श्रीरामपूर

श्री.पप्पु लक्ष्मण थोरात
भोकर, ता.श्रीरामपूर

श्रीमती सिताबाई रामदास जगदाळे
व्हा.चेअरमन भोकर सोसायटी, ता.श्रीरामपूर

श्री.संदिप शेरमाळे
गळनिंब, ता.श्रीरामपूर